


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २६४ * नांदेड * रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## भूकंपाच्या धक्क्याने नांदेड-हिंगोली हादरले; सकाळी दोनवेळा जमीन हादरल्याने नागरिकांमध्ये घबराट

### ३.३ आणि ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेची नोंद; केंद्रबिंदू हिंगोलीतील पांगरा शिंदे गाव

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड आणि हिंगोली जिल्ह्याला शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी भूकंपाच्या दोन सौम्य ते मध्यम धक्क्यांनी हादरवले. अचानक काही सेकंद जमीन हादरल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली असून अनेकजण भीतीपोटी घराबाहेर पडले. यापूर्वीही भूकंपाचे धक्के जाणवले होते. सकाळी मोठा धक्का जाणवल्यानंतर एकमेकांना भ्रमणध्वनीवरून विचारपूस करण्यात आली.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, पहिला धक्का आज सकाळी ७ वाजून ४६ मिनिटांनी जाणवला, त्याची तीव्रता ३.३ रिश्टर स्केल होती. त्यानंतर दुसरा जोरदार धक्का ९ वाजून ४३ मिनिटांनी बसला, त्याची तीव्रता ४.५ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली आहे.

या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील पांगरा शिंदे हे गाव असल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्रबिंदू हिंगोलीत असला तरी तीव्रता जास्त असल्याने त्याचा परिणाम शेजारील नांदेड जिल्ह्यावरही मोठ्या प्रमाणात जाणवला. हिंगोली जिल्ह्यातील बहुतांश भागासह नांदेड शहर, ग्रामीण




भागातही हादरे बसले. सकाळी कामाच्या वेळेतच धक्का बसल्याने सर्वत्र धावपळ उडाली. आखाडा बाळापूर, कळमनुरी, बोल्डा, वसमत, डोंगरकडा, मालेगाव, अर्धापूर, नांदेड शहर, मुदखेड, लिंबगाव या भागात चांगलाच धक्का जाणवला.

सुदैवाने या भूकंपामुळे कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही, अशी प्राथमिक माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून नांदेड, हिंगोली परिसरात सातत्याने भूगर्भातून आवाज येणे आणि सौम्य ते मध्यम भूकंपाचे धक्के बसण्याचे सत्र सुरू आहे. आजचा ४.५ तीव्रतेचा धक्का तुलनेने मोठा मानला जात आहे. भूकंपाचे धक्के जाणवल्यास तात्काळ सुरक्षितपणे घराबाहेर पडून मोकळ्या जागेत थांबावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे परिस्थितीवर लक्ष ठेवून असून त्यांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या आहेत.

#### नागरिकांनी घाबरू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये –पालकमंत्री अतुल सावे

जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून त्यांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नसून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून जाऊ नये आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले आहे.

## भारताचा आशिया क्रिकेटवर झेंडा

### पाकिस्तान चारीमुंड्या चीत, टीम इंडियाने गोल्ड मेडल जिंकलं!

**टोकिओ (वृत्तसंस्था)–** आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने पुन्हा एकदा आपला दबदबा सिद्ध करत प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा १९ धावांनी दणदणीत पराभव करत टीम इंडियाने गोल्ड मेडल जिंकलं आहे.

जपानमधील कोरोगी स्पोर्ट्स पार्क येथे रंगलेल्या या हाय-व्होल्टेज सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा घेतलेला निर्णय फलंदाजांनी पूर्णपणे सार्थ ठरवला. अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा यांच्या तुफानी अर्धशतकांच्या जोरावर भारताने बोर्डावर ६ बाद २११ धावांचा डोंगर उभारला. या भल्यामोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय गोलंदाजांच्या भेदक मारासमोर पाकिस्तानचा हसन नवाझ एकटा पडला. त्याने ९६ धावांची धडाकेबाज खेळी केली,



परंतु तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले, तर पाकिस्तानला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

पाकिस्तान विरुद्धच्या सुवर्णपदकाच्या सामन्यात भारतीय सलामीवीर वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्मा यांनी आक्रमक सुरुवात केली. मात्र, भारताला पहिला धक्का वैभवच्या रूपाने बसला. वैभव ९ चेंडूंमध्ये १५ धावा करून बाद झाला. त्याने दोन षटकार ठोकले. मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात त्याला विकेट गमवावी लागली. वैभव स्वस्तात बाद झाल्यानंतर अभिषेक शर्माने भारताचा डाव सावरत पाकिस्तानच्या गोलंदाजांची धुलाई केली. अभिषेकने अवघ्या २८ चेंडूंमध्ये ६१ धावांची तुफानी खेळी केली. त्याच्या खेळीत ७ चौकार आणि ३ षटकार होते. दरम्यान, संजू सॅमसन ४ चेंडूंमध्ये २ धावा करून बाद झाला. कर्णधार श्रेयस अय्यरने २४ चेंडूंमध्ये २१ धावा केल्या, तर इशान किशनने १८ चेंडूंमध्ये २० धावांचे योगदान दिले.

भारताच्या डावाला मोठी धावसंख्या मिळवून देण्यात तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांनी अखेरच्या टप्प्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या शिवम दुबेने १५ चेंडूंमध्ये २७ धावा ठोकल्या. त्याने २ चौकार आणि २ षटकार मारले. दुसरीकडे, तिलक वर्माने नाबाद ५१ धावांची खेळी करत भारताला २०० धावांचा टप्पा ओलांडून दिला. तिलकने अवघ्या २२ चेंडूंमध्ये ३ चौकार आणि ४ षटकारांसह ५१ धावा केल्या. अशाप्रकारे भारताने २० षटकांत ६ गडी गमावून २११ धावा केल्या.

## शिवाजी पार्कवर विनापरवाना आंदोलन, अभिजीत दिपकेंसह ५०० कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईतील दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्क मैदानावर विनापरवाना बेकायदेशीरपणे आंदोलन करणे आणि लाउडस्पीकरचा वापर करणे कॉकरोच जनता पार्टी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना महागात पडले आहे. परवानगी नाकारलेली असतानाही २ ऑक्टोबर रोजी शिवाजी पार्कवर गर्दी जमवून जोरदार घोषणाबाजी केल्याप्रकरणी दादर पोलिसांनी सीजेपीचे राष्ट्रीय संघटक अजिंक्य शिंदे, मुंबई कोऑर्डिनेटर प्रणव आहिरे यांच्यासह तब्बल ४०० ते ५०० कार्यकर्त्यांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उगझ चे राष्ट्रीय संघटक अजिंक्य शिंदे आणि मुंबई कोऑर्डिनेटर प्रणव आहिरे यांनी २ ऑक्टोबर रोजी शिवाजी पार्क येथे आंदोलनासाठी परवानगी मागितली होती. मात्र, सुरक्षेचे आणि कायदा-सुव्यवस्थेचे कारण देत पोलिसांनी आंदोलनाला स्पष्ट शब्दांत परवानगी नाकारली होती.

असे असतानाही, गुरुवारी (२ ऑक्टोबर) सायंकाळी ४ ते ७ वाजेच्या सुमारास शिवाजी पार्क मैदान, गेट क्रमांक ६, मीनाताई ठाकरे स्मारकासमोर शेकडो समर्थक एकत्र जमले. आंदोलकांनी विनापरवाना सार्वजनिक ठिकाणी सभा घेऊन घोषणाबाजी केली तसेच मोठ्या आवाजात लाउडस्पीकरचा वापर केला.

विनापरवाना जमाव जमवणे, सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीला व नागरिकांना अडथळा निर्माण करणे आणि पोलिसांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी दादर पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे.

## आंध्र प्रदेशातील फार्मा कारखान्यात बॉयलरचा भीषण स्फोट; ४ कामगारांचा मृत्यू, १० जखमी

**तिरूपती (प्रतिनिधी)–** आंध्र प्रदेशातील तिरुपती जिल्ह्यातील श्री सिटीमधील औद्योगिक परिसरात शनिवारी सकाळी एका फार्मास्युटिकल कारखान्यात बॉयलरचा भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत किमान चार कामगारांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीची शिफ्ट संपवून कामगार बाहेर पडण्याच्या तयारीत असतानाच अचानक बॉयलरचा जोरदार स्फोट झाल्याची ही दुर्दैवी घटना घडली. या स्फोटानंतर कारखान्यात भीषण आग लागली आणि इमारतीच्या छताचा काही भाग कोसळला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली आणि ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढले. या दुर्घटनेत जखमी झालेल्या कामगारांवर सध्या नजीकच्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

## भारतीय हॉकी संघाने नागोयात रचला इतिहास; सुवर्णपदकासह २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकचे तिकीट कन्फर्म

**टोकिओ (प्रतिनिधी)–** पुरूष हॉकी स्पर्धेत भारत आणि मलेशिया यांच्यात एशियन गेम्स २०२६ स्पर्धेचा अंतिम सामना रंगला. भारताने मलेशियाला ५-१ गोलने पराभवाची धूळ चारून सुवर्ण पदकावर नाव कोरलं. यासह भारताने सलग दुसऱ्या एशियन गेम्स स्पर्धेत जेतेपदाला गवसणी घातली आहे. यापूर्वी असं कधीच घडलं नव्हतं.

या सामन्यात पहिल्या क्वॉर्टरपासून चुरशीची लढाई पाहायला मिळाली. १२व्या मिनिटाला भारताने एक गोलची आघाडी घेतली. भारतीय संघाला मिळालेला पेनाल्टी कॉर्नर पंचांनी पुन्हा घेण्याची परवानगी दिली. या सुवर्णसंधीचा पुरेपूर फायदा घेत कर्णधार हरमनप्रीत सिंगने अप्रतिम आणि अचूक ड्रॅगफ्लिकद्वारे चेंडू गोलपोस्टमध्ये धाडला. या गोलसह भारताला १-० अशी शानदार सुरुवात मिळाली. पण पुढच्या मिनिटाला भ्रमनिरास झाला.



भारताने आघाडी घेतल्यानंतर अवघ्या एकाच मिनिटात मलेशियाने सामन्यात पुनरागमन केले. मैदानाबहेरील बाजूने मारलेला एक लांब पल्ल्याचा शॉट भारतीय गोलकीपर सूरज करकेराकडून जज करण्यात मोठी चूक झाली आणि चेंडू गोल लाईन ओलांडून आत गेला. या गोलमुळे सामना १-१ अशा बरोबरीत आला.

## उल्हासनगरमध्ये भाजपने शिवसेनेचा पाठिंबा काढला

**ठाणे (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील उल्हासनगरमध्ये महायुतीमधील दोन प्रमुख घटक पक्ष असलेल्या भाजप आणि शिवसेनेतील अंतर्गत संघर्ष आता थेट रस्त्यावर आणि पत्रकार परिषदांपर्यंत पोहोचला आहे. उल्हासनगर महापालिकेतील स्वीकृत नगरसेवक पदाच्या निवडीनंतर वाद चिघळला. त्यानंतर भाजपने पत्रकार परिषद घेऊन महायुतीतून बाहेर पडण्याची अधिकृत घोषणा केली आहे. तसेच आगामी कोणत्याही निवडणुकीत खासदार श्रीकांत शिंदे यांना सहकार्य न करण्याची आक्रमक भूमिका भाजपने घेतली आहे.

भाजपने युती तोडल्याची घोषणा करताच शिवसेनेने तातडीने दुसरी पत्रकार परिषद घेऊन आपली बाजू मांडली. आम्ही अजूनही युतीमध्येच आहोत, असे स्पष्टीकरण शिवसेनेकडून देण्यात आले.

## मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची जागा महायुतीत अखेर राष्ट्रवादीकडेच!

### भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांकडून १५ नावांची यादी दिल्लीत सादर

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषदेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटला आहे. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटासाठी सोडण्यात आली आहे. यासह अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'पुणे शिक्षक मतदारसंघा'वरून भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. मात्र, वरिष्ठ पातळीवरील दीर्घ चर्चेनंतर पुणे शिक्षक मतदारसंघ अखेर भाजपच्याच वाट्याला देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाल्याची माहिती समोर येत आहे.

जागा वाटपामध्ये पुणे शिक्षक मतदारसंघ भारतीय जनता पक्षाकडे, पुणे पदवीधर मतदारसंघ भारतीय जनता पक्षाकडे, नागपूर पदवीधर मतदारसंघ भारतीय जनता पक्ष, अमरावती शिवसेना (शिंदे गट) व छत्रपती संभाजीनगर मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर मतदारसंघाची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सुटली असून या जागेवर सतीश चव्हाण यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली असल्याची चर्चा सुरू आहे.

यासह पुणे शिक्षक मतदारसंघाची जागा भाजपला मिळताच पक्षांतर्गत हालचालींना प्रचंड वेग आला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेऊन तिन्ही मतदारसंघांतील उमेदवारांच्या नावाची यादी सुपूर्द केली आहे.

भाजपने प्रत्येक जागेसाठी ५ संभाव्य उमेदवारांचे पर्याय ठेवले असून, ३ मतदारसंघांसाठी एकूण १५ नावं केंद्रीय नेतृत्वाकडे सोपवण्यात आली आहेत. यामध्ये पुण्याच्या जागेवरील प्रमुख दावेदारांचाही समावेश असून, केंद्रीय निवडणूक समितीकडून लवकरच अधिकृत उमेदवाराच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाणार आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांतील अनेक स्थानिक इच्छुकांनी दावा ठोकला होता. आता ही जागा भाजपच्या खात्यात गेल्यामुळे मित्रपक्षांतील इच्छुकांमध्ये काही प्रमाणात नाराजी पाहायला मिळत आहे. मात्र, महायुतीचा धर्म पाळत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील नाराज इच्छुकांची वरिष्ठांकडून समजूत काढली जाईल, असे भाजप नेत्यांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आज ठाकरे बंधूचा मुंबईत मोर्चा

**मुंबई (प्रतिनिधी)–** निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात आणि ज्ञानेश कुमार हे मनमानी कारभार करत असल्याचा आरोप करत ठाकरे बंधू हे आज रस्त्यावर उतरतील. मुंबईत आज दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता विराट गर्जना मोर्चा निघणार आहे. या मोर्चानिमित्ताने मुंबईत मोठा पोलीस बंदोबस्त असेल. याविषयीची संयुक्त पत्रकार परिषद ठाकरे बंधूंनी घेतली. त्यात मुख्य निवडणूक आयुक्तासोबतच त्यांचा रोख भाजपवर असल्याचे दिसून आले. निवडणूक आयोगावर टीका केल्यावर भाजपच्या पोटात का दुखते असा रोकडा सवाल राज ठाकरे यांनी विचारला आहे.

## मुंबईसह महाराष्ट्रातून मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू; हवामान विभागाची घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईसह राज्यातील काही भागातून मोसमी वारे अर्थात मान्सूनने माघार घेण्यास सुरुवात केली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने याबाबतची घोषणा केली आहे. दरम्यान, पुढील २ ते ३ दिवसांत संपूर्ण महाराष्ट्रातून मान्सून माघारी फिरण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. त्यामुळे राज्यातील मान्सूनचा परतीचा प्रवास लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे.

मोसमी वारे हे राज्यामधल्या काही भागांमधून माघारी गेलेले आहेत. मुंबईसह राज्यामधल्या काही भागांमधून मोसमी वारे हे सध्या माघारी फिरत आहेत. पुढचे दोन-तीन दिवसात संपूर्ण राज्यामधून मान्सून माघारी फिरण्यासाठी अनुकूल असं वातावरण तयार होतं आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने या संदर्भातली माहिती दिली आहे. शेतकऱ्यांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी देखील चिंता निर्माण करणारी ही बातमी आहे. भारतीय हवामान विभागाकडून मोठी घोषणा केली आहे. राज्यातल्या काही भागातून मोसमी वारे माघारी परतले असल्याची घोषणा ही भारतीय हवामान केंद्राकडून करण्यात आलेली आहे आणि सोबतच पुढील दोन ते तीन दिवसात संपूर्ण राज्यातून हे मोसमी वारे माघारी परततील एकूणच परतीचा पाऊस हा कुठेतरी होईल, अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.




## 'एफडीए'ची 'सिप्ला' फार्मावर पुन्हा कारवाई!

**पुणे (प्रतिनिधी)–** न्यायालयीन निर्देशांनुसार नव्याने प्रक्रिया करून वडकीतील 'सिप्ला फार्मा अँड लाइफ सायन्सेस'चे औषध विक्री परवाने रद्द करण्याचा आदेश अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) गुरुवारी दिला. 'एफडीए'ने प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

वडकीतील सिप्ला फार्मावर ऑगस्टमध्ये केलेल्या कारवाईबाबत उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून पूर्वीची कार्यवाही मागे घेण्यात आली होती. नंतर चार सप्टेंबरला सुधारित 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली. संस्थेने ११ सप्टेंबरला लेखी उत्तर सादर केले. वैयक्तिक सुनावणीची संधी २१ सप्टेंबरला देण्यात आली.

'संस्थेचे लेखी उत्तर, सुनावणीतील म्हणणे, तपासणीतील




निष्कर्ष, उपलब्ध अभिलेख आणि लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींचा एकत्रित विचार करून संस्थेचे वडकी, पुणे येथील सीएफए घाऊक औषध विक्री परवाने रद्दचा आदेश सहायक आयुक्त (औषधे), परिमंडळ ३ तथा परवाना प्राधिकारी, अन्न व औषध प्रशासन, पुणे यांनी एक ऑक्टोबरला काढला. त्यामुळे हा निर्णय केवळ पूर्वीच्या कारवाईची पुनरावृत्ती नसून, न्यायालयीन निर्देशांनुसार नव्याने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून घेतलेला स्वतंत्र नियामक निर्णय आहे,' अशी माहिती 'एफडीए'ने दिली.

## किनवटच्या महाघोटाळ्यातील ६ आरोपींना न्यायालयीन कोठडी

**किनवट (प्रतिनिधी)–** येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील तब्बल १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपयांच्या कथित गैरव्यवहारप्रकरणी पोलीस कोठडीत असलेल्या सहा आरोपींना किनवटच्या दिवाणी न्यायालयाने शनिवारी १६ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात अनेक धक्कादायक बाबी उघड होत आहेत.

किनवट येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयातील महाघोटाळा उघड झाल्यानंतर पोलिसांनी दि.२० सप्टेंबर रोजी कार्यालयातील वरिष्ठ लिपीक तथा रोखपाल भगवान डवरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या संवेदनशील प्रकरणाचा तपास नांदेडच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे



सोपविण्यात आला. गुन्हे शाखेच्या पथकाने दि.२५ सप्टेंबर रोजी या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार भगवान डवरे याच्यासह त्याचे साथीदार संतोष भडंगे, निरंजन मिरासे यांना गोव्यातून अटक केली होती. त्यानंतर दि.२६ सप्टेंबर रोजी संतोष मारपवार याला तर दि.२९ सप्टेंबर रोजी हरीश माहूरकर आणि गोविंद उत्तमराव अन्नपूर्णे यांना अटक केली होती.

अटकेतील एकूण ६ आरोपींना किनवटच्या दिवाणी न्यायालयाने दि.३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. शनिवारी पोलीस कोठडी संपल्यानंतर आरोपींना पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. पोलीस कोठडीत प्रथमदर्शनी हवी असलेली माहिती आणि काही मुद्देमाल हस्तगत केल्यामुळे पोलिसांनी आरोपींच्या पुन्हा पोलीस कोठडीसाठी आग्रह धरला नाही. सहायक सरकारी वकील डी.ए. झाडे तसेच आरोपींच्या किनवट व नांदेड येथील खासगी वकिलांच्या युक्तिवादानंतर न्या.प्रदीप माने यांनी सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

अटकेतील सहा आरोपींच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर शनिवारी दुपारी नांदेडच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने सहाही आरोपींची किनवट पोलीस ठाण्यातून दिवाणी न्यायालयापर्यंत पदयात्रा काढली. आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे समजताच त्यांच्या नातेवाईकांसह बघ्यांनी न्यायालय परिसरात गर्दी केली.

# तारा माय...

कथा



गणपतीच्या दिवसांत आंबेशिवला दर्शनासाठी गेलो होतो. गणपतीचे दर्शन झाल्यानंतर नेहमीप्रमाणे पाटेकरांच्या तारा आईला भेटावे, म्हणून त्यांच्या घरी गेलो. तारा आईला भेटणे म्हणजे माझ्यासाठी नेहमीच एका वेगळ्या मायेचा अनुभव असायचा. तिच्या चेहऱ्यावरचं ते ममत्व, बोलण्यातला आपलेपणा आणि प्रत्येकाला आपलंसं करून घेण्याची तिची पद्धत मनाला नेहमीच भावायची.

त्या दिवशी मात्र तारा आईला पाहताच मला जाणवलं, तिच्या मनात काहीतरी खोलवर दडलेलं आहे.

मी तिच्यासमोर गेलो आणि मला पाहताच तिच्या डोळ्यांत अचानक पाणी आलं. क्षणभर ती माझ्याकडे पाहत राहिली आणि पुढच्याच क्षणी तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या.

बाळा... सगळी दिसत्यात, पण माझा मधू मला दिसत नाही... ती म्हणाली.

तिचा आवाज कापत होता. ज्यांच्या खांद्यावर आम्ही जायचं, त्यालाच देवाने अगोदर नेलं...तारा आईच्या या शब्दांनी माझ्या काळजात काहीतरी हललं. तिच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू पाहून माझ्याही डोळ्यांत पाणी आलं. पण ते तिला दिसू नये म्हणून मी स्वतःला सावरलं.

काही क्षण तिच्याजवळ बसलो. तिच्या दुःखाला शब्द नव्हते आणि माझ्याकडेही तिचं दुःख कमी करण्यासाठी कोणतेच शब्द नव्हते. तरीही आईचं मन थोडं हलकं व्हावं म्हणून मी तिला समजावू लागलो.

आई, सगळ्यांनाच एक दिवस तिथे जायचं आहे. या जगात कोणीही कायमचं राहणार नाही. आपल्यालाही एक दिवस जावंच लागणार आहे. देवाची इच्छा आपण बदलू शकत नाही. तुम्ही स्वतःला सावरलं पाहिजे...

माझे शब्द मी बोलत होतो; पण ते शब्द तिच्या दुःखापुढे किती अपुरे आहेत, याची जाणीव मला आतून होत होती.

तिला समजावून सांगून मी तिथून निघालो.

रिक्षाने बदलापूर स्टेशनच्या दिशेने निघालो. रिक्षा पुढे सरकत होती; पण माझं मन मात्र तिथेच, तारा आईजवळ थांबलं होतं.

तिचं ते बोलणं पुन्हा पुन्हा माझ्या कानात घुमत होतं. सगळी दिसत्यात, पण माझा मधू मला दिसत नाही... त्या एका वाक्यात एका आईचं संपूर्ण आयुष्य सामावलं होतं.

रिक्षा रस्त्यावरून पुढे जात होती आणि माझ्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं. रस्त्यावरची माणसं, वाहने, दुकानं, गर्दी... सगळं डोळ्यांसमोर दिसत होतं; पण माझ्या डोळ्यांसमोर मात्र तारा आईचाच चेहरा उभा राहत होता.

तिचे डोळे आठवत होते.

त्या डोळ्यांतलं दुःख आठवत होतं, आणि त्या दुःखामागची आईची माया आठवत होती.

रिक्षा बदलापूर स्टेशनच्या दिशेने पुढे सरकत होती आणि माझ्या डोळ्यांत नकळत पाणी साचत होतं. मी ते पुसत होतो; पण मन मात्र तारा आईच्या आठवणींत अधिकाधिक खोल जात होतं.

पाटेकरांच्या आईचा जीवनपट माझ्या डोळ्यांसमोर एखाद्या चित्रपटाप्रमाणे उलगडू लागला. ज्या आईने आपल्या मुलासाठी स्वतःची किडनी दिली...ज्या आईने मुलाच्या आयुष्यासाठी स्वतःच्या शरीराचा एक अवयव देण्याचीही पर्वा केली नाही...तीच तारा आई आज आपल्या मुलाला गमावून बसली होती.

आईच्या मायेची ही किती विलक्षण गोष्ट आहे! मुलाच्या जीवासाठी स्वतःचा जीव पणाला लावणारी आई, मुलगा डोळ्यांसमोर नसताना त्याच्या आठवणींमध्ये मात्र त्याला सतत शोधत राहते.

तारा आईचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोरून काही केल्या जात नव्हता, आणि त्या चेहऱ्यामागची तिची कहाणी मला पुन्हा पुन्हा आठवत होती.

बदलापूरमधील भिणार पाडा येथे बाबू जमदाडे आणि राजी यांच्या पोटी पाच कन्यारत्नं आणि पाच पुत्र अशी दहा अपत्यं जन्माला आली. या दहा भावंडांमध्ये ताराबाई या सर्वांत मोठ्या मुलगी.

घरची परिस्थिती तशी बेताचीच होती. आजच्यासारखं शिक्षण, बालपण, खेळ, स्वप्नं यांना तेव्हा फारसं महत्त्व नव्हतं. गरिबीच्या परिस्थितीत मुलीचं लग्न लवकर करून देणं, हीच त्या काळातील सामाजिक पद्धत होती. ताराबाईंच्या वाट्यालाही तेच आलं. अवघ्या बारा वर्षांच्या कोवळ्या वयात त्यांचा विवाह येथील पाटेकर कुटुंबात झाला. वय होतं हसण्याखेळण्याचं...

मैत्रिणींबरोबर खेळण्याचं...

आईच्या कुशीत लाड करून घेण्याचं...

आणि स्वप्नांच्या जगात रमण्याचं...पण नियतीने त्यांच्या हातात खेळण्यांऐवजी संसाराची जबाबदारी दिली. ज्या वयात मुलीला स्वतःचं आयुष्य काय असतं, याचीही पूर्ण जाणीव नसते, त्या वयात ताराबाईंवर संसाराची जबाबदारी पडली. एका घरातून दुसऱ्या घरात त्या आल्या आणि बालपण तिथेच मागे राहिलं.

नव्या घरातील माणसं, नवी नाती, नव्या जबाबदाऱ्या आणि संसाराचा गाडा...हे सगळं समजून घेण्याआधीच ताराबाई त्या संसाराचा एक अविभाज्य भाग बनल्या. काळ पुढे सरकत गेला. बालपण संपलं.

ताराबाई आई झाल्या, आणि आई झाल्यानंतर त्यांच्या आयुष्याला एक वेगळाच अर्थ मिळाला. मुलं म्हणजे आईच्या आयुष्याचा श्वास असतो, असं म्हणतात. ताराबाईंच्या बाबतीत हे केवळ म्हणणं नव्हतं; त्यांनी ते आपल्या कृतीतून सिद्ध केलं. मुलांच्या सुखासाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट केले. मुलांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्वतःच्या गरजा बाजूला ठेवल्या.

मुलांच्या आयुष्यात एखादी अडचण आली की त्या अडचणीसमोर आई म्हणून त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. पण त्यांच्या आयुष्यात अशी एक वेळ आली, ज्या वेळी आईपणाची खरी परीक्षा होती. मुलाच्या आयुष्यावर संकट आलं होतं, आणि त्या संकटातून मुलाला वाचवण्यासाठी तारा आईने स्वतःच्या शरीराचा एक भाग देण्याचा निर्णय घेतला. आपल्या मुलासाठी स्वतःची किडनी देणं, हा निर्णय कोणत्याही आईसाठी साधा निर्णय नाही. पण आईच्या मायेपुढे स्वतःचं शरीरही गौण ठरतं.

मुलाचा जीव वाचणार असेल, मुलाला नवजीवन मिळणार असेल, तर स्वतःच्या शरीराचा एक भाग देण्यातही तिला कमीपणा वाटत नाही. तारा आईने तेच करून दाखवलं. आज त्या मुलगा मधूला गमावून बसल्या आहेत. ज्या मुलासाठी त्यांनी स्वतःची किडनी दिली, ज्या मुलाच्या आयुष्यासाठी स्वतःच्या शरीराची पर्वा केली नाही, तोच मुलगा आज त्यांच्या डोळ्यांसमोर नाही. म्हणूनच कदाचित त्या दिवशी मला पाहताच त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले होते.

आईच्या मनाला समजावण्याची भाषा नसते. तिला तत्त्वज्ञान सांगून तिचं दुःख संपत नाही. सगळ्यांनाच एक दिवस जायचं आहे, हे खरं असलं, तरी आपल्या लेकराला गमावलेल्या आईच्या काळजातली पोकळी त्या एका वाक्याने भरून निघत नाही. तारा आईच्या त्या अश्रूंनी मला हेच शिकवलं. आई आपल्या मुलासाठी किती काही करू शकते, याला खरंच मर्यादा नाही, आणि म्हणूनच आजही त्या दिवशी रिक्षातून बदलापूर स्टेशनकडे जाताना दिसलेला तारा आईचा चेहरा माझ्या मनात तसाच कोरलेला आहे. त्या चेहऱ्यावर आईचं दुःख होतं...मुलाला गमावल्याची वेदना होती... पण त्याचबरोबर आपल्या मुलासाठी आयुष्यभर झटलेल्या एका आईच्या मायेची विलक्षण ताकदही होती.

तारा माय म्हणजे केवळ एक आई नाही.

ती आईच्या मायेची, त्यागाची आणि प्रेमाची जिवंत कहाणी आहे.

आई आपल्या मुलांसाठी काय करू शकते, याचं उत्तर शब्दांत सांगण्याची गरज नाही; तारा माईंनी ते आपल्या कृतीतून दाखवून दिलं आहे.

**–जयराम महादू कराळे**
मानिवली ता.मुरबाड जि.ठाणे
मो. ९२२१६ २७४८१

# जीवन जगण्याचा अचूक इंजिनिअरिंग फॉर्म्युला: भगवद्गीता सार आणि संदेश

पुस्तक परिचय

डॉ. गोपाळ कदम
मु. पो. लिंबगाव, जि. नांदेड
मो. ९७०४४२१००५

आजचे २१ वे शतक हे ताणतणाव, प्रचंड स्पर्धा, अस्थिरता आणि भौतिक सुखांच्या मागे धावणारे शतक म्हणून ओळखले जाते. तंत्रज्ञानाने मानवी जीवन सुसह्य केले असले, तरी माणसाचे मानसिक स्वास्थ्य मात्र कमालीचे बिघडले आहे. आजचा आधुनिक मानव बाह्य जगावर ताबा मिळवण्यात यशस्वी झाला आहे, पण स्वतःच्या अंतर्मनातील युद्धाने तो पार खचून गेला आहे. हजारो वर्षांपूर्वी कुरुक्षेत्राच्या रणांगणावर महापराक्रमी अर्जुन ज्या संभ्रमावस्थेत आणि नैराश्यात सापडला होता, तशीच काहीशी मानसिक स्थिती आजच्या सामान्य माणसाची झाली आहे. कुरुक्षेत्रावरील अर्जुनाचा तो विषाद योग आणि त्यावर भगवान श्रीकृष्णांनी केलेले मार्गदर्शन म्हणजे 'श्रीमद्भगवद्गीता' या शाश्वत आणि वैश्विक ग्रंथावर आजवर अनेक संत, विचारवंत आणि तत्त्वज्ञांनी भाष्य केले आहे. परंतु, इंजिनिअर बी. एन. कऱ्हाळे लिखित 'भगवद्गीता सार आणि संदेश' हे पुस्तक या परंपरेत एक अत्यंत वेगळा, आधुनिक आणि प्रामुख्याने व्यावहारिक दृष्टिकोन घेऊन समोर येते.

लेखक बी. एन. कऱ्हाळे हे पेशाने स्थापत्य अभियंता (सिव्हिल इंजिनिअर) असून ते शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. निवृत्तीनंतरच्या वेळेचा सदुपयोग करत त्यांनी श्रीमद्भगवद्गीतेचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या या व्यावसायिक आणि तांत्रिक पार्श्वभूमीचा प्रभाव पुस्तकाच्या पानापानांवर आणि मांडणीवर स्पष्टपणे जाणवतो.सहसा अध्यात्माचा विषय आला की, त्यात केवळ कर्मकांड, संन्यास किंवा क्लिष्ट संस्कृत श्लोकांची रेलचेल असते असा एक समज आहे. मात्र, एक अभियंता जेव्हा अध्यात्माकडे पाहतो, तेव्हा त्याला त्यामध्ये मानवी मन आणि जीवन सुरळीत चालवण्याचे एक अचूक 'इंजिनिअरिंग' किंवा शास्त्र दिसते. हाच शास्त्रीय, व्यावहारिक आणि तार्किक दृष्टिकोन लेखकाने या पुस्तकात अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. अध्यात्म म्हणजे संन्यास घेऊन हिमालयात जाणे नव्हे, तर संसारात राहूनही कर्तव्ये कशी चोख पार पाडायची, याचे व्यवस्थापन व मार्गदर्शन म्हणजे गीता आहे, हा संदेश पुस्तकातून मिळतो.

या पुस्तकाचे सर्वात मोठे, अद्वितीय आणि वाचकप्रिय वैशिष्ट्य म्हणजे याची त्रिभाषिक रचना जी एकाच पुस्तकात समाविष्ट केली आहे. लेखकाने वेगवेगळ्या भाषांसाठी स्वतंत्र पुस्तके न छापता, इंग्रजी, मराठी आणि हिंदी या तीनही प्रमुख भाषांना एकाच पुस्तकात अतिशय सुंदर रीतीने गुंफले आहे.

आजच्या बहुभाषिक समाजात आणि विशेषतः एकाच कुटुंबात वेगवेगळ्या पिढ्यांची भाषेची आवड वेगवेगळी असू शकते. घरातील ज्येष्ठ व्यक्तीला मराठी किंवा हिंदीत वाचायला आवडते, तर आजच्या कॉन्व्हेंट किंवा इंग्रजी माध्यमातून शिकलेल्या तरुण पिढीला इंग्रजी भाषा जवळची वाटते. हीच गरज ओळखून एकाच पुस्तकात तीनही भाषांची अशी मांडणी केली आहे की, ज्यामुळे संपूर्ण कुटुंब एकत्र बसून या ग्रंथाचा अभ्यास करू शकते. इंग्रजीतील आधुनिक तांत्रिक शब्द, मराठीतील रसाळपणा आणि हिंदी भाषेतील सुटसुटीतपणा एकाच वेळी अनुभवायला मिळतो. यामुळे हे पुस्तक प्रादेशिक सीमा ओलांडून देशातील आणि विदेशातील सर्व प्रकारच्या वाचकांसाठी अत्यंत सुलभ ठरते. एकाच पुस्तकात तीन भाषांचा असा संगम आणि समन्वय साहित्य जगतात दुर्मिळच म्हणावा लागेल!

भगवद्गीतेमध्ये एकूण १८ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत. सर्वसामान्य वाचकाला किंवा आजच्या व्यस्त तरुणाला हे ७०० श्लोक वाचणे आणि त्यांचा सखोल अर्थ समजून घेणे वेळेअभावी कठीण जाते. हीच अडचण ओळखून लेखकाने संपूर्ण गीतेतील अतिशय महत्त्वाचे आणि मानवी जीवनाला थेट दिशा देणारे निवडक श्लोक या पुस्तकासाठी निवडले आहेत. पुस्तकात हे महत्त्वाचे श्लोक केवळ उद्धृत केले नसून, त्यांचा अत्यंत सोप्या आणि सुटसुटीत भाषेत उलगडा केला आहे. प्रत्येक श्लोकामागील भगवंतांचा



मूळ हेतू काय होता आणि तो संदेश आपण आपल्या रोजच्या जगण्यात, ऑफिसमध्ये किंवा कौटुंबिक जीवनात कसा लागू करू शकतो, याचा थेट आणि व्यावहारिक अर्थ लेखकाने दिला आहे. यामुळे वाचकाचा वेळ वाचतो आणि गीतेचा मूळ गाभा अत्यंत कमी वेळात थेट मनावर रुजवला जातो.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' यांसारख्या प्रसिद्ध आणि महत्त्वाच्या श्लोकांचे स्पष्टीकरण देताना आजच्या दैनंदिन जीवनाशी अतिशय कौशल्याने सांगड घातली आहे. आजचा तरुण किंवा व्यावसायिक एखादे काम करताना कामाच्या आनंदापेक्षा त्याच्या परिणामांची काळजी जास्त करतो. यामुळे कामाचा ताण वाढतो आणि अपयश आले की नैराश्य येते. या पुस्तकात श्लोकांच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे की, कर्मावर आपला अधिकार आहे, पण फळावर नाही. याचा अर्थ असा नाही की आपण ध्येय ठेवू नये; तर याचा अर्थ असा आहे की आपण परिणामाच्या चिंतेत आपली ऊर्जा वाया न घालवता, वर्तमान क्षणात आपले शंभर टक्के योगदान दिले पाहिजे. निष्काम कर्मयोगाचा हा संदेश आजच्या व्यवस्थापन शास्त्राच्या दृष्टीने किती अचूक आहे, हे लेखकाने इंग्रजी, मराठी आणि हिंदी या तीनही भाषांमध्ये अगदी सोप्या पद्धतीत दिले आहे.

पुस्तकातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे 'मनाचे नियंत्रण'. भगवद्गीतेत म्हटले आहे की, माणसाचा मन हाच त्याचा सर्वात मोठा शत्रू आणि सर्वात मोठा मित्रही बनू शकतो. मनाच्या या लहरीपणाला आटोक्यात आणण्यासाठी गीतेत सांगितलेल्या 'अभ्यास आणि वैराग्य' या सूत्रांचे सोपे विश्लेषण केले आहे. १२ व्या अध्यायातील भक्तीयोगाचे विश्लेषण करताना लेखकाने भक्तीची व्याख्या अतिशय व्यापक केली आहे. भक्ती म्हणजे केवळ देवळात जाऊन घंटा वाजवणे नाही, तर आपल्या वाट्याला आलेले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे, समाजाप्रती कृतज्ञ राहणे आणि सर्व प्राणिमात्रांबद्दल आदर बाळगणे म्हणजे खरी भक्ती, हा विचार लेखक मांडतात. हा विचार आजच्या समाजात वाढलेला द्वेष आणि असहिष्णुता कमी करण्यासाठी अत्यंत गरजेचा आहे.

इंजिनिअर कऱ्हाळे यांच्या लेखनाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांनी अध्यात्माची भाषा ही विज्ञानाच्या आणि तर्काच्या कसोटीवर घासून घेतली आहे. विश्वाची निर्मिती, आत्म्याचे अमरत्व आणि निसर्गाचे नियम (त्रिगुण - सत्व, रज, तम) यांचे स्पष्टीकरण देताना त्यांनी अंधश्रद्धेला कुठेही थारा न देता, एक शुद्ध, विवेकवादी विचार वाचकांसमोर मांडला आहे. विज्ञानाचा विद्यार्थी असो की साहित्याचा अभ्यासक, प्रत्येकाला हे पुस्तक आपलेसे वाटते. आजच्या तरुण पिढीला दिशा दाखवण्यासाठी हे पुस्तक एक उत्तम मार्गदर्शकाचे काम नक्कीच करू शकेल. इंग्रजी, मराठी आणि हिंदी या तिन्ही भाषा अवगत असलेल्या आजच्या 'ग्लोबल तरुणाईला' करिअरचे दडपण, नातेसंबंधांमधील दुरावा, अपयशाची भीती आणि मनःशांतीचा अभाव या सर्व समस्यांची उत्तरे या पुस्तकात अतिशय साध्या रूपात मिळतात. कृतज्ञता बाळगत कठीण प्रसंगात स्वतःला कसे सांभाळावे आणि योग्य निर्णय कसा घ्यावा, याचे आत्मबळ हे पुस्तक वाचकाला देते. पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत आकर्षक आणि लक्षवेधी आहे, जे वाचकांना पहिल्याच नजरेत खिळवून ठेवते. मलपृष्ठावर समीक्षकांच्या सकारात्मक प्रतिक्रिया आहेत, ज्यावरून या पुस्तकाची समाजातील उपयुक्तता स्पष्ट होते.

थोडक्यात सांगायचे तर, इंजिनिअर बी. एन. कऱ्हाळे यांनी 'भगवद्गीता सार आणि संदेश' या पुस्तकाच्या माध्यमातून प्राचीन ज्ञानाचा आजच्या आधुनिक पिढीसाठी एक सुलभ, त्रिभाषिक आणि भक्कम पूल तयार केला आहे. हे पुस्तक एकदा वाचून कपाटात ठेवावे असे नाही, तर जीवनाच्या प्रत्येक वळणावर मार्गदर्शक म्हणून सोबत ठेवण्याचे आहे. निवांत क्षणी स्वतःच्या अंतर्मनाचा शोध घेणारे, मनाला सकारात्मक ऊर्जा देणारे आणि वैचारिक समृद्धी घडवणारे हे पुस्तक प्रत्येकाने आवर्जून वाचायला हवे. २१ व्या शतकातील त णा व ग्र स्त मानवाला योग्य दिशा दाखवणाऱ्या या अप्रतिम आणि व्या व हा रि क लेखनासाठी लेखक बी. एन. कऱ्हाळे यांना मनःपूर्वक शुभेच्छा! आपले हे वैचारिक कार्य असेच अविरत सुरू राहो, हीच सदिच्छा! 'दैनिक गोदातीर समाचार'च्या सुजाण वाचकांसाठी हा पुस्तक परिचय नक्कीच एका नव्या वैचारिक प्रवासाची सुरुवात ठरेल यात शंका नाही.

**पुस्तकाचे नाव: भगवद्गीता सार आणि संदेश**
**लेखक: इंजिनिअर बी. एन. कऱ्हाळे**
**किंमत: ४००/– रु.**
**(क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स, नांदेड)**

## स्मरण क्रांतिवीरांचे !

जे लढले होते तेव्हा
आज ते अस्तित्वात नाहीत,
आहेत जे आज ईथे त्यांना
स्वातंत्र्याचे मोलच नाही
दुःखाची झळ सोसली त्यांनी
भविष्याची पर्वा केली नाही,
सुख आज आम्ही उपभोगतोय
आम्हाला त्यांची कदर नाही...
स्वप्न त्यांच्या डोळ्यातले
पारतंत्र्यात कधी साकारले नाही,
त्यांच्या स्वप्नांचे मूल्य
आम्हाला आज कळणार नाही
रक्त सांडले, फास स्वीकारला
जखमांना कधी कुरवाळले नाही,
ध्यास एकची स्वातंत्र्याचा
मोहाचा स्पर्श होऊ दिला नाही...
हसत हसत लढत राहिले
वंदे मातरम् बोलण्यास विसरले नाही,
मृत्यु समोर उभा असतानाही
माघार त्यांना मान्य नाही
देशाला केले मुक्त जोखडातून
छळाला त्यांनी जुमानले नाही,
लढले ते वीर क्रांतिकारक
स्वातंत्र्याची फळे त्यांनी चाखली नाही...
गणतंत्र दिनाच्या या पवित्र क्षणी
त्यांना न स्मरून चालणार नाही
ते लढले म्हणून आज आहोत आपण
त्यागाविना त्यांच्या आपले अस्तित्वच नाही
आपले अस्तित्वच नाही

**–ज्योती रावराणे,**
कांजूरमार्ग, मुंबई

## अभंग गुरू

अनादी अनंत ।रुप भगवंत।
गुरु निष्ठावंत । कल्पतरु ।।धृ.।।
गुरु माझी माय। गुरु माझा पिता।
घराचा नियंता।बाप गुरु ।।१।।
दयेचा सागर।गुरु बंधू कांता।
चालता बोलता।शिकवित ।।२।।
गुरु मार्ग दाता।जीवना उध्दरी।
संस्कार शिदोरी।गुरु देत।।३।।
नाही अंधःकार।कृपेची सावली।
प्रेमळ माऊली।जीवनात।।४।।
गुरु असे थोर।अगाध महिमा।
नाही त्या उपमा।गुरु सखा।।५।।
मनी राहो प्रीत।गुरु ठायी भक्ती।
गुरु देती शक्ती।नित्य नवी।।६।।
ज्ञानाचे आगर।गुरु दिव्य दृष्टी।
गुरु सत्य सृष्टी।ठायी ठायी।।७।।
प्रवि मागे दान।गुरु व्हावे जन।
आदर्श वागुन ।आप्तजन।।८।।

**–प्रल्हाद वि.घोरबांड**
महात्मा फुले हायस्कूल,
बाबानगर नांदेड
मो. ९०११३५२०६१

# अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ अभिनेत्री संध्या

आपल्या अभिनय आणि नृत्य कौशल्याने मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांची आज स्मृतिदिन. अभिनेत्री संध्या यांचे ४ ऑक्टोबर २०२५ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले होते. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली. अभिनेत्री संध्या म्हणजे अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ. २७ सप्टेंबर १९३२ रोजी जन्मलेल्या अभिनेत्री संध्या यांचे पूर्ण नाव विजया श्रीधर देशमुख असे होते. त्यांचे वडील रंगभूमीवरील कलाकार होते. त्यामुळे अभिनेत्री संध्या यादेखील रंगभूमीवर काम करू लागल्या. त्यांच्या मोठ्या भगिनी वत्सला या देखील रंगभूमीवर काम करत असत.



अभिनेत्री संध्या यांना लहानपणापासूनच नृत्याची आवड होती त्यामुळे त्या नृत्याचे देखील कार्यक्रम करत असत. याच नृत्याने त्यांना चित्रपट सृष्टीत प्रवेश मिळवून दिला. दिग्दर्शक व्ही शांताराम यांनी अमर भूपाळी या चित्रपटासाठी अभिनेत्री संध्या यांची निवड केली कारण हा चित्रपट तमाशाप्रधान होता. यातील मुख्य नायिका ही तमासगिरीन होती. सहकाजीकच नायिकेला नृत्य कौशल्याची जाण असणे गरजेचे होते.

अभिनेत्री संध्या यांच्याकडे नृत्य कौशल्याची चांगली जाण असल्याने त्यांची या चित्रपटासाठी निवड झाली. या चित्रपटातील तमासगिरणीच्या भूमिकेसाठी अभिनेत्री संध्या यांनी खूप कष्ट आणि नृत्याचे धडे गिरवले. त्यांच्या या कष्टाचे चीज झाले. हा चित्रपट खूप गाजला. यातील गाणीही खूप गाजली. त्यानंतर त्यांना परछाई या हिंदी चित्रपटात खलनायिकेची भूमिका मिळाली या चित्रपटात त्यांनी संध्या हे नाव धारण केले पुढे हेच नाव रूढ झाले. झनक झनक पायल बाजे या संगीतप्रधान चित्रपटातही त्यांनी मुख्य नायिकेची भूमिका साकारली. या भूमिकेने त्यांना अनेक चित्रपट मिळवून दिले. तीन बत्ती चार रास्ता, दो आँखें बाराह हात, नवरंग यासारखे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील हिट झाले.

नवरंग या चित्रपटातील जा रे जा नटखट...या गाण्यात त्यांनी पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही भूमिका निभावल्या. त्यानंतर त्यांनी स्त्री, सेहरा, लडकी सह्याद्री की, जल बन मछली नृत्य बिन मजली हे त्यांचे चित्रपट देखील गाजले. अभिनेत्री संध्या यांचा सर्वाधिक गाजलेला आणि लक्षात राहिलेला चित्रपट म्हणजे पिंजरा. या चित्रपटात त्यांनी साकारलेली नायिका अजूनही रसिकांच्या मनात घर करून आहे. अभिनय सम्राट निळू फुले, डॉ श्रीराम लागू यांच्यासारखे दिग्गज कलावंत असतानाही अभिनेत्री संध्या यांची भूमिका रसिकांच्या लक्षात राहिली. या चित्रपटातील सर्व गाणी गाजली.

या चित्रपटाने त्याकाळी विक्रम केला होता. चंदनाची चोळी अंग अंग जाळी हा त्यांचा शेवटचा चित्रपट. हा चित्रपटही गाजला. त्यानंतर मात्र त्यांनी मनोरंजन विश्वातून निवृत्ती स्वीकारली. अभिनेत्री संध्या यांनी राजकमल चित्रपट संस्थेखेरीज इतर कोणत्याही चित्रपट संस्थेच्या चित्रपटात काम केले नाही. शेवटपर्यंत त्या राजकमल आणि व्ही शांताराम यांच्याशी एकनिष्ठ राहिल्या. त्यांनी व्ही शांताराम यांच्याशी विवाह केला. व्ही शांताराम यांच्या त्या तिसऱ्या पत्नी होत्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. महाराष्ट्र सरकारने त्यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने गौरविले. अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ असलेल्या अभिनेत्री संध्या यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# पिण्याच्या पाण्याचा अनधिकृत उपसा केल्यास कठोर कारवाई -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

- जलाशयातील पाणीसाठा सिंचनासाठी वापरण्यास मनाई
- मोटारपंप, टँकरसह साहित्य जप्त करून गुन्हा दाखल करणार
- जलाशय परिसरातील साहित्य स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर) अंतर्गत शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पातील अन्तेश्वर उच्च पातळी बंधारा, विष्णुपुरी उच्च पातळी बंधारा व रेणापूर सुधा लघु प्रकल्प तसेच नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) अंतर्गत उर्ध्व मानार प्रकल्प, लिंबोटी येथील संपूर्ण पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आला आहे. या पाणीसाठ्याचा नियोजनानुसार पिण्यासाठी वापर व्हावा आणि अनधिकृत उपसा रोखण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधितांना सूचना केल्या आहेत.

शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या दि. १२ डिसेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार या आरक्षित पाणीसाठ्याचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित जलाशयावरील सर्व परवानाधारक शेतकऱ्यांनी पाणीसाठा केवळ पिण्यासाठी आरक्षित असल्याची नोंद घेऊन मोटारपंप, इंजिन, टँकर अथवा अन्य साधनांद्वारे पाणी उपसा करून सिंचन करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

जलाशयाच्या परिसरात असलेले मोटारपंप, इंजिन, टँकर, स्टार्टर, केबल, सर्व्हिस वायर तसेच अन्य साहित्य संबंधितांनी स्वतःहून काढून घ्यावे. पाण्याचा अनधिकृत उपसा होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात येईल. तसेच भरारी पथकाद्वारे मोटारपंप, इंजिन, टँकर, स्टार्टर, केबल, सर्व्हिस वायर आदी साहित्य जप्त करून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित असलेल्या पाणीसाठ्याचे संरक्षण व उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यासाठी सर्व संबंधितांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## जंगमवाडी भाजपा मंडळाकडून ५ व ७ ऑक्टोबरला विविध लोकोपयोगी शिबिरांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या जंगमवाडी मंडळाच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विविध लोकोपयोगी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. नगरसेवक तथा जंगमवाडी मंडळ भाजपा अध्यक्ष आशिष धुंडीराज नेरलकर यांच्या पुढाकारातून आयोजित या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्य, औषधोपचार, शासकीय योजना तसेच परिवहनाशी संबंधित सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या अभियानाचा पहिला टप्पा सोमवार, दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नगरसेवक आशिष नेरलकर यांच्या ११८, विवेक नगर, श्री मारुती मंदिराजवळ, नांदेड येथील निवासस्थानी होणार आहे. त्यानंतर बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत श्री मारुती मंदिर, बजाज नगर, नांदेड येथे अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सेवा संकल्प अभियानात पात्र नागरिकांसाठी आयुष्मान भारत कार्ड नोंदणी व वाटप, जन औषधी योजनेबाबत मार्गदर्शन व जनजागृती, तसेच एसटी महामंडळाच्या विविध कार्डांशी संबंधित सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन, नोंदणी आणि संबंधित प्रक्रियेसाठी एसआयआर कॅम्प आयोजित करण्यात आला आहे.

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, पात्रता आणि नोंदणी प्रक्रियेबाबतही नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेणे सुलभ होणार आहे. सेवा संकल्प अभियानाचे नांदेड संयोजक संजीव जिंदल आणि नगरसेवक तथा जंगमवाडी मंडळ भाजपा अध्यक्ष आशिष नेरलकर यांच्या संयोजनातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. अभियानात जास्तीत-जास्त नागरिकांनी सहभागी होऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सीईओ गावात आले, पण शासकीय अधिकारी गायब!

## वरिष्ठ अधिकारी दुष्काळाच्या बांधावर; अधिकारी-कर्मचारी मात्र मुख्यालयी का राहत नाहीत? नागरिकांचा संतप्त सवाल

**शंकरनगर (प्रतिनिधी)**– एकीकडे दुष्काळाने शेतकरी होरपळत असताना वरिष्ठ अधिकारी थेट शेताच्या बांधावर जाऊन जनतेच्या व्यथा जाणून घेत आहेत तर दुसरीकडे त्यांच्याच प्रशासनातील कर्मचारी मुख्यालयी उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. यामुळे सामान्य जनतेने दाद मागायची तरी कुणाकडे? असा संतप्त सवाल शंकरनगर परिसरातील ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

नांदेड जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी रामतीर्थ येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली असता ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसह शासकीय अधिकाऱ्यांची गैरहजेरी असल्याचे निदर्शनास आल्याची माहिती आहे. या प्रकारामुळे शासकीय अधिकारी मुख्यालयी वास्तव्यास राहतात की जिल्ह्याच्या ठिकाणाहून ये-जा करतात, याबाबत परिसरातील नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा होत आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. शेतकरी, मजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय योजनांसाठी शासकीय कार्यालयाशी सातत्याने संपर्क साधावा लागतो. अशा परिस्थितीत संबंधित अधिकारी मुख्यालयी उपलब्ध नसतील तर नागरिकांनी आपल्या समस्या मांडायच्या कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शासनाकडून ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्याचा दावा केला जात असताना, प्रत्यक्ष गावपातळीवर प्रशासनातील अधिकारीच उपलब्ध नसतील तर त्या योजनांचा लाभ सामान्य जनतेपर्यंत पोहोचणार कसा? असा सवाल ग्रामस्थांनी केला आहे.



ग्रामपंचायत अधिकाऱ्यांसह शासकीय अधिकारी मुख्यालयी वास्तव्यासंदर्भात प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे. सीईओंच्या भेटीदरम्यान संबंधित शासकीय अधिकारी गैरहजर का होते, याची चौकशी करून त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सीईओंच्या प्रत्यक्ष भेटीतच शासकीय अधिकारी गैरहजर राहात असतील, तर सामान्य नागरिकांच्या कामासाठी ते नियमितपणे उपलब्ध असतात का? हा प्रश्न आता परिसरात चर्चेचा विषय बनला आहे.

या प्रकरणाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन वस्तुस्थिती तपासावी आणि दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## श्री दत्तप्रभू प्रा. व उच्च प्रा. शाळेत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– श्री दत्तप्रभू प्राथमिक, उच्च प्राथमिक शाळेत राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव धर्माधिकारी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक महेश धर्माधिकारी यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्याची, विचारांची तसेच सामाजिक योगदानाची माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. त्यांच्या सत्य, अहिंसा, साधेपणा, देशप्रेम व राष्ट्रसेवेच्या विचारांचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. बी. सावंत यांनी केले, तर आभार सौ. आगलावे आर. पी. यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. एस. डी. हिवराळे, सौ. एस. एन. पापुलवार, पी. जी. नागरगोजे व जी. एस. काळे यांनी परिश्रम घेतले.

## जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे यश

**नांदेड (प्रतिनिध)**– नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत येथील प्रतिभा निकेतन महाविद्यालयाच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंनी सुवर्णपदकावर आपले नाव कोरत विभागीय स्पर्धेत प्रवेश मिळविला आहे.

स्पर्धेत १९ वर्षांखालील ४८ ते ५१ वजनगटात संगेश जाधव याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच १९ वर्षांखालील ४३ ते ४८ वजनगटात साईनाथ बेरजे याने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत प्रथम क्रमांक मिळवला.

# शिखर व सुभाष शुगर कारखान्यांचा अंतिम उसदर ३२०१ रुपये; टप्प्याटप्प्याने दरवाढीचे प्रोत्साहन

**हदगाव (प्रतिनिधी)**– यंदाच्या गाळप हंगामात पर्जन्यमानातील कमतरता आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शिखर साखर कारखाना लि., वाकोडी (ता. कळमनुरी, जि. हिंगोली) आणि श्री सुभाष शुगर प्रा. लि., हडसणी (ता. हदगाव, जि. नांदेड) या दोन्ही साखर कारखान्यांनी गाळप हंगाम २०२६-२७ साठी ऊसदर धोरण जाहीर केले आहे. या धोरणानुसार अंतिम उसदर प्रतिमेट्रिक टन ३२०१ रुपये निश्चित करण्यात आला असून, ठरावीक कालावधीत ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना अतिरिक्त प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येणार आहे.



दोन्ही कारखान्यांच्या एकत्रित गाळप क्षमतेचा विचार करता प्रतिदिन सुमारे १९ हजार मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कळमनुरी, हदगाव, हिमायतनगर, उमरखेड तसेच गोटेगाव विभागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी दोन्ही कारखान्यांना विश्वासाने ऊस पुरवठा करून सहकार्य करावे, असे आवाहन कारखाना प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

जाहीर करण्यात आलेल्या ऊसदर धोरणानुसार गाळप हंगाम सुरू झाल्यापासून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिमेट्रिक टन ३२०१ रुपये दर मिळणार आहे. १ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत ऊस पुरवठा केल्यास प्रतिमेट्रिक टन १०० रुपये अतिरिक्त प्रोत्साहन देण्यात येणार असून, एकूण दर ३३०१ रुपये होणार आहे. तर १ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिमेट्रिक टन २०० रुपये अतिरिक्त प्रोत्साहन मिळणार असून, एकूण दर ३४०१ रुपये होणार आहे.

या दरवाढीच्या माध्यमातून ऊस उत्पादकांना वेळेत ऊस पुरवठा करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा तसेच पुढील गाळप हंगामासाठी उसाची उपलब्धता वाढविण्याचा कारखाना प्रशासनाचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले.

## राजर्षी शाहू विद्यालयात कै. माधवराव पाटील शेळगावकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**नांदेड (प्रतिनिधी)**– राजर्षी शाहू विद्यालय वसंतनगर, नांदेड येथे मराठवाडा शिक्षण संस्थेचे संस्थापक विश्वस्त तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. माधवराव पाटील शेळगावकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व कृषीक्षेत्रातील योगदानाला उजाळा दिला.

कै. माधवराव पाटील शेळगावकर हे महाराष्ट्र राज्य ग्रामस्वच्छता अभियानाचे अध्यक्ष होते. हागणदारीमुक्त गाव अभियानांतर्गत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात पायपीट करून जनजागृती केली. त्यांच्या स्वतःच्या शेळगाव गौरी या गावाला महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासनाचा ग्रामस्वच्छता पुरस्कार मिळवून देण्यात त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांनी अनेक वेळा गावचे बिनविरोध सरपंच म्हणून कार्य केले. तसेच नायगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.

## नांदेड दक्षिण काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी मारोती सांगवीकर

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची विचारधारा, ध्येय-धोरणे व लोकशाही मूल्यांप्रती असलेली निष्ठा तसेच सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत मारोती रामचंद्र सांगवीकर यांची नांदेड दक्षिण विधानसभा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



नांदेड दक्षिण विधानसभा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीनिवास मोरे यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही नियुक्ती केली. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सांगवीकर यांनी केलेले योगदान लक्षात घेऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नियुक्तीप्रसंगी लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, खासदार रवींद्र चव्हाण, नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, नांदेड शहराध्यक्ष अब्दुल गफार, राजेश पावडे, आनंद गुंडले, शंकर शिंदे, नगरसेवक मुन्नाअब्बास, अंबादास रातोळे तसेच कंधारचे नगराध्यक्ष शहाजी नळगे यांची उपस्थिती होती.

# वसरणी येथील निवासी अंध विद्यालयातील नेत्र तपासणीला उत्तम प्रतिसाद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नवीन नांदेड भागातील वसरणी येथील निवासी अंध विद्यालयात विद्यार्थ्यारहि नुकतीच नेत्र तपासणी करण्यात आली. या नेत्र तपासणीला विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

ज्योतीबा फुले सेवा ट्रस्ट नांदेड संचलित निवासी अंध विद्यालय वसरणी येथे कम्युनिटी आय. केअर फाऊंडेशन (सी.ई.सी.एफ.) आणि डॉ. गोगाटे आय. क्लिनिक पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील विविध अंध शाळांमध्ये लोव्हिजन विद्यार्थ्यांसाठी तपासणी व मूल्यांकन कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत निवासी अंध विद्यालय वसरणी नांदेड येथे गुरुवार, दि. १ ऑक्टोंबर रोजी मोहनकुमार लोव्हिजन कन्सलटंट यांच्या



नेतृत्वाखाली कार्यात्मक दृष्टी मूल्यांकन तसेच नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीत डॉ. मोहनकुमार, डॉ. रोहितसिंग गौड, डॉ. अनिकेत शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली जवळपास ४५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये विद्यार्थ्यांची उपलब्ध दृष्टी, दैनंदिन जीवनातील शैक्षणिक आणि कार्यात्मक बाबीसाठी कितपत उपयोगी आहे याचे मूल्यांकन केले. तसेच दृष्टीची स्थिती, डोळ्याशी संबंधी समस्या आणि विद्यार्थ्यांना लोव्हिजन, साहित्य किंवा पुढील नेत्र तपासणी उपचाराची आवश्यकता आहे काय? याचे मूल्यमापन करण्यात आले आहे.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या उपलब्ध दृष्टीचा जास्तीत जास्त प्रभावी वापर करण्यासाठी आणि गरजेनुसार पुढील नेत्र सेवेसाठी रेफरल देणे हा आहे. दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण, संगणक, प्रशिक्षण, वाचन, लेखन तसेच दैनंदिन व्यवहार अधिक सुलभ व्हावे यासाठी योग्य सहायक साधने अत्यंत महत्वाचे आहेत. ही बाब लक्षात घेऊन तपासणी दरम्यान विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार आवश्यक साहित्य व दृष्टी सहायक साधने उपलब्ध करुन देण्यासाठी कम्युनिटी आय. केअर सेंटरच्या वतीने सांगण्यात आले. यामुळे भविष्यात आवश्यक उपचार, मार्गदर्शन व सहायक साधनांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारच्या आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन नियमितपणे होणे आवश्यक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाचे नांदेडमध्ये आज मार्गदर्शन शिबीर; जिल्हा- तालुका कार्यकारिणी जाहीर होणार

**नांदेड (प्रतिनिधी)**–आदिवासी मन्नेरवारलू समाजाच्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्यावतीने रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता देवकृपा मंगल कार्यालय येथे मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात मन्नेरवारलू महासंघाची जिल्हा व तालुकानिहाय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड राहणार असून, प्रमुख मार्गदर्शक म्हणून सचिव सुरेशराव अंबुलगेकर, मारोतराव कंठेवाड यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच कोषाध्यक्ष नामदेव मिठ्ठेवाड, सहसचिव व्यंकटराव सूर्यवाड, संचालक बाबुराव पुजरवाड, दत्तात्रय अन्नमवार, मोहनराव गोपुलवाड, दिलीप बाष्टेवाड, नागनाथ अनंतवाड, गंगाधर गिरोड, मधुकर उन्हाळे, यलप्पा कोलेवाड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या शिबिराला देगलूर येथील शंकर कंठेवार, अधीक्षक अभियंता सुधाकर कचकलवाड, माणिकराव पेरके, सेवानिवृत्त डीवायएसपी डॉ. किशनराव लखमावार, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, तहसीलदार संजय वारकड, सुनील माचेवाड, विजय येरावाड, उद्योजक बालाजी कंठेवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, सेवानिवृत्त तहसीलदार किशोर जक्कल, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता विजय धारासूरकर, शंकर तोटावार, बळीराम सुकरे, महाजन उप्पलवाड, राम लोलापोड, विकास तोटावार, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विश्वंभर मिटके, व्यंकट गंगलवाड, सिव्हिल सर्जन डॉ. नागेश लखमावार, डॉ. संजय पेरके, डॉ. इरवंत पल्लेवाड, सूर्यकांत मंकावार यांच्यासह अनेक ज्येष्ठ मान्यवर व युवा कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

या शिबिरादरम्यान महासंघाची जिल्हा व तालुकास्तरीय नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी केले आहे.

# मुक्या जनावरांसाठी नायगाव नगरपंचायतीची जलसेवा

## बैल बाजाराच्या दिवशी मोफत पाण्याची व्यवस्था

**नायगाव (प्रतिनिधी)**– नायगाव येथे दर गुरुवारी भरणाऱ्या बैल बाजारासाठी मराठवाड्यातील विविध भागांसह पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने बैल व अन्य जनावरे घेऊन येतात. मात्र, सध्या परिसरात पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने बाजारात येणाऱ्या मुक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. ही अडचण लक्षात घेऊन नायगाव नगरपंचायतीच्या माध्यमातून जनावरांसाठी मोफत पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

नायगाव नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण यांच्या पुढाकारातून दर गुरुवारी बैल बाजाराच्या दिवशी जनावरांसाठी जलसेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. बाजारात येणाऱ्या जनावरांना सहजपणे पाणी मिळावे, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून,



त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी गैरसोय दूर झाली आहे.

नायगावचा बैल बाजार हा परिसरातील मोठ्या बाजारांपैकी एक मानला जातो. बाजाराच्या दिवशी शेकडो शेतकरी आपल्या जनावरांसह नायगावमध्ये दाखल होतात. जनावरांसाठी पाणी ही मूलभूत गरज असतानाही पाण्याची उपलब्धता हा अनेकदा दुर्लक्षित राहणारा विषय ठरतो. अशा परिस्थितीत नगरपंचायतीने पुढाकार घेत जनावरांसाठी मोफत पाण्याची व्यवस्था करणे हा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. दुष्काळसदृश परिस्थितीत माणसांसोबतच मुक्या जनावरांच्या गरजांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. त्याच भूमिकेतून हा उपक्रम राबविला जात असल्याचे सांगण्यात येत आहे. शेतकरी आणि त्यांच्या पशुधनाशी निगडित प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहत प्रत्यक्ष कृतीतून मदतीचा हात देण्याचा प्रयत्न उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण यांच्या पुढाकारातून होत असल्याने त्यांच्या कार्याचे शेतकरी वर्गातून कौतुक होत आहे.

जनावरांना बाजारात आणल्यानंतर त्यांची पाण्याची गरज भागविण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. दर गुरुवारी ही जलसेवा सुरू ठेवण्यात येत असल्याने बाजारात येणाऱ्या पशुधनाला त्याचा नियमित लाभ मिळणार आहे.

# 'केमिस्ट्री टू करिअर' विषयावर सायन्स कॉलेजमध्ये विद्यापीठस्तरीय परिसंवाद

**नांदेड (प्रतिनिधी)**– केमिस्ट्री टू करिअर : संधी आणि कौशल्य विकास या विषयावर विद्यापीठस्तरीय परिसंवादाचे आयोजन सायन्स कॉलेज नांदेड येथील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी करण्यात आले. विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र क्षेत्रातील विविध करिअरच्या संधींची माहिती करून देणे तसेच उच्च शिक्षण, संशोधन आणि व्यावसायिक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मार्गदर्शन करणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश होता.

परिसंवादाचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते झाले. करण्यात आले. उद्घाटनपर भाषणात डॉ. महाजन यांनी विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र क्षेत्रातील विविध करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी व्यावहारिक तसेच व्यावसायिक कौशल्यांचा सक्रियपणे विकास करावा आणि ऑन-द-जॉब ट्रेनिंगसारख्या उपक्रमांचा लाभ घेऊन व्यावहारिक अनुभव मिळवावा व



आपली रोजगारक्षमता वाढवावी, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. श्यामल पत्की ह्या होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच भविष्यातही अशा शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रमांसाठी महाविद्यालयाकडून सातत्यपूर्ण सहकार्य व पाठिंबा देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. हैद्राबाद येथील तांत्रिक अधिकारी एन. रमेश यांनी रसायनशास्त्र क्षेत्रातील विविध करिअर आणि संशोधनाच्या संधींवर माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सीएसआयआरच्या विविध प्रयोगशाळांचे कार्य व तेथे सुरू असलेल्या संशोधनाची माहिती करून दिली. तसेच विद्यार्थ्यांनी या संस्थांमधील उपलब्ध संधींचा शोध कसा घ्यावा आणि त्यांच्याशी कशाप्रकारे संपर्क साधावा, याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच डॉ. महेश चंद्र, प्रा. मल्ला रेड्डी यांनी विद्यार्थ्यांना प्रभावी संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि व्यावसायिक क्षमता विकसित करण्यासाठी प्रेरित केले. त्यांच्या संवादात्मक सत्रातून यशस्वी करिअर घडविण्यासाठी संवादकौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आले. या कार्यक्रमास २५० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडशी संलग्न विविध महाविद्यालयांमधील सुमारे १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. उपस्थित विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन तसेच त्यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली.

या परिसंवादामुळे विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र क्षेत्रातील विविध करिअरच्या संधी समजून घेण्यासाठी, संशोधनाच्या विविध संधींचा शोध घेण्यासाठी तसेच त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीसाठी कौशल्य विकासाचे महत्त्व जाणून घेण्यासाठी एक मौल्यवान व्यासपीठ उपलब्ध झाले. या परिसंवादाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. आर. मुंडे, डॉ. ए. टी. शिंदे, डॉ. एन. जे. देशमुख, वाय. आर. रामासने आणि के. के. जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

# चंदेरी

## अर्चना पूरन सिंह यांनी मड आयलंडमध्ये घेतला नवा बंगला



अभिनेत्री अर्चना पूरन सिंह यांनी मुंबईतील मड आयलंडमध्ये आणखी एक बंगला खरेदी केला आहे. अर्चना यांनी नुकत्याच आपल्या यूट्यूब चॅनेलवर या नव्या घराची झलक दाखवली. पती परमीत सेठी, मुले आर्यमान आणि आयुष्मान तसेच कुटुंबातील इतर सदस्यांसह त्यांनी नव्या बंगल्याची पाहणी केली. हा बंगला त्यांच्या सध्याच्या घरापासून काही मीटर अंतरावर आहे. सध्याच्या घरात अर्चना आणि परमीत यांच्यासोबत त्यांची मुले, त्यांचे जोडीदार तसेच अर्चना यांच्या आई आणि परमीत यांच्या वडिलांचाही समावेश आहे. नवे घर आर्यमान आणि त्याची मंगेतर योगिता बिहानी यांच्यासाठी सजवले जात आहे. दोन मजली या बंगल्यात तळमजल्यावर प्रशस्त बैठक आणि स्वयंपाकघर आहे. खाद्यपदार्थांशी संबंधित व्हिडिओंच्या चित्रीकरणासाठी हे स्वयंपाकघर उत्तम असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. घरात तीन बेडरूम असून, प्रत्येक खोलीला स्वतंत्र स्नानगृह आहे. मोठ्या खिडक्यांमधून नैसर्गिक प्रकाश घरात भरपूर येतो. बंगल्याभोवती हिरवाई असून बाहेर बाग आहे.



## सलमान खानच्या 'मातृभूमी'ला सरकारची हिरवी झेंडी!

अभिनेता सलमान खानच्या आगामी 'मातृभूमी' या युद्धपटाच्या प्रदर्शनाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. निर्मात्यांनी सादर केलेल्या चित्रपटाच्या नव्या आवृत्तीला माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, चित्रपटाला अद्याप केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून (सीबीएफसी) प्रमाणपत्र मिळणे बाकी आहे. सलमान खानच्या या चित्रपटाची घोषणा सुरुवातीला 'बॅटल ऑफ गलवान' या नावाने करण्यात आली होती. त्यानंतर या वर्षाच्या सुरुवातीला चित्रपटाचे नाव बदलून 'मातृभूमी' करण्यात आले. २०२० मध्ये भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर चित्रपटाची कथा आधारित



असल्याचे सांगितले जाते. भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये अलीकडे सुधारणा झाल्याच्या पार्श्वभूमीवर चित्रपटातील चीनशी संबंधित काही दृश्यांवर आक्षेप घेण्यात आल्याची माहिती आहे. त्यानंतर निर्मात्यांनी चित्रपटाच्या मूळ आवृत्तीत अनेक बदल केले. नव्या आवृत्तीत भारत-चीन संबंध अधिक सकारात्मक पद्धतीने मांडण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

## अजय देवगणची विशेष मुलाखत

# हाडे दुखू लागली की वयाची जाणीव होते; केलेल्या स्टंटचा परिणाम आता जाणवतोय...

**अभिनेता अजय देवगण सध्या आपल्या आगामी 'दृश्यम ३' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. तब्बल ३५ वर्षांचा प्रदीर्घ चित्रपटसृष्टीतील प्रवास पूर्ण केलेल्या अजय देवगण यांनी पत्रकारांशी 'दृश्यम ३'विषयी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीसमोरील आव्हानांबाबत संवाद साधला. या वेळी त्यांनी आपल्या कारकिर्दीत केलेल्या अनेक स्टंट्सचा परिणाम आता शरीरावर जाणवत असल्याचेही सांगितले.**

प्रादेशिक चित्रपट असो किंवा हॉलिवूड, प्रत्येक ठिकाणी चित्रपट बनवणे आव्हानात्मक असते. मात्र, हिंदी चित्रपट बनवणे तुलनेने अधिक कठीण असल्याचे अजय देवगण यांनी सांगितले. ते म्हणाले, की "मी इतर कोणत्याही चित्रपटसृष्टीचे महत्त्व कमी करत नाही. पारंपरिक चित्रपट असो किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सिनेमा, प्रत्येक ठिकाणी चित्रपट बनवणे कठीणच आहे. मात्र, मला वाटते की हिंदी चित्रपट बनवणे सर्वांत कठीण आहे. त्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे आपला नेमका लक्ष्यित प्रेक्षकवर्ग कोण आहे, हेच स्पष्टपणे सांगता येत नाही." "पंजाबी, तेलुगू किंवा तमिळ चित्रपट बनवताना तेथील प्रेक्षकवर्ग कोण आहे, याची स्पष्ट कल्पना असते. विशिष्ट प्रदेशासाठी चित्रपट तयार केला जात असल्याने तेथील प्रेक्षकांची नाडी ओळखता येते आणि त्यानुसार चित्रपट बनवता येतो. मात्र, हिंदी भाषिक प्रदेशात प्रत्येक ८०-९० किलोमीटरनंतर भाषा आणि लोकांची विचार करण्याची पद्धत बदलते. त्यात शहरी, निमशहरी, लहान शहरांतील तसेच सर्वसामान्य प्रेक्षक असे विविध स्तर आहेत," असे त्यांनी स्पष्ट केले. "एखाद्या वर्गाला चित्रपट आवडला, तर दुसऱ्या वर्गाला तो आवडेलच असे नाही. त्यामुळे चित्रपटाचा व्यवसायही अपेक्षेइतका मोठा होऊ शकत नाही. हिंदी चित्रपट बनवताना आपल्याला सर्व प्रकारच्या प्रेक्षकांना लक्षात घ्यावे लागते. त्यामुळे हिंदी चित्रपट लिहिणे आणि बनवणे हे सर्वांत कठीण काम आहे," असे अजय देवगण म्हणाले.



### 'दृश्यम 3'ची कथा वेगळी

अजय देवगण यांच्या गाजलेल्या 'दृश्यम' चित्रपट मालिकेचा तिसरा आणि अंतिम भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटाबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, हिंदीतील 'दृश्यम ३' हा मल्याळम चित्रपटापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. "ही पूर्णपणे नवीन कथा आहे. व्यक्तिरेखा तीच आहे; मात्र ती साकारण्याची पद्धत काहीशी वेगळी वाटू शकते," असे त्यांनी सांगितले.

### 'सीक्वल'पेक्षा व्यक्तिरेखा महत्त्वाच्या

'दृश्यम'च्या पुढील भागांच्या यशाबाबत बोलताना अजय देवगण यांनी 'सीक्वलपेक्षा व्यक्तिरेखा चालतात', असे मत व्यक्त केले. ते म्हणाले, की "माझ्या मते सीक्वलपेक्षा व्यक्तिरेखा महत्त्वाच्या असतात. तुम्ही कोणताही सीक्वल पाहा, मग तो 'गोलमाल' असो किंवा 'दृश्यम'. तिथे गोपाल, विजय साळगावकर किंवा सिंघम या व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनात घर करून राहिल्या आहेत. जेव्हा प्रेक्षक एखाद्या व्यक्तिरेखेशी जोडले जातात, तेव्हाच तिच्यावर आधारित पुढील भाग बनवता येतो." "एखादा चित्रपट खूप चांगला होता आणि प्रेक्षकांना आवडला म्हणून केवळ त्याचा सीक्वल बनवता येत नाही. प्रेक्षकांना त्या व्यक्तिरेखांशी भावनिक नाते निर्माण झालेले असणे आवश्यक आहे," असेही त्यांनी सांगितले.

### व्यक्तिरेखांशी जास्त जोडले गेलो तर...

दीर्घकाळ एखादी व्यक्तिरेखा साकारताना तिच्याशी भावनिक नाते निर्माण होते का, असा प्रश्न अजय देवगण यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, "मी माझ्या व्यक्तिरेखांशी फारसा जोडला जात नाही. अर्थात, एखादी व्यक्तिरेखा आवडू लागते. मात्र, कलाकार आपल्या व्यक्तिरेखांशी अतिशय भावनिकरीत्या जोडले गेले, तर ते स्वतःची खरी ओळख विसरू शकतात." "मग खऱ्या आयुष्यातही आपण कोणती व्यक्तिरेखा साकारत आहोत, हे कळेनासे होईल. त्यामुळे व्यक्तिरेखेपासून स्वतःला काही प्रमाणात वेगळे ठेवणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

### 'दर्शक आमच्यापेक्षा पुढे गेले आहेत...'

बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये बदल करण्याबाबत बोलताना अजय देवगण म्हणाले की, कलाकार स्वतःला नव्याने घडवत आहेत, असे मला वाटत नाही. उलट, बदललेल्या प्रेक्षकांच्या विचारसरणीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. "कोविड महामारीनंतर आम्हाला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. त्या काळात लोक घरात होते आणि त्यांनी आंतरराष्ट्रीय तसेच विविध भारतीय भाषांमधील चित्रपट मोठ्या प्रमाणावर पाहिले. त्यानंतर परिस्थिती सामान्य झाली आणि आम्ही पुन्हा चित्रपट प्रदर्शित करू लागलो, तेव्हा लक्षात आले की प्रेक्षक आमच्यापेक्षा बरेच पुढे गेले आहेत," असे अजय देवगण यांनी सांगितले. "आता आम्हालाही त्यांच्यासोबत पावले टाकावी लागणार आहेत. प्रेक्षक ज्या वेगाने बदलत आहेत, त्या वेगाशी जुळवून घेणे सोपे नाही. त्यामुळे आम्हाला सातत्याने सुधारणा करावी लागेल, नवे शिकावे लागेल आणि स्वतःच्या मर्यादा पुढे न्याव्या लागतील. कारण प्रेक्षक आमच्यापेक्षा अधिक जाणकार झाले आहेत. आपण त्यांना सहज फसवू शकत नाही," असे त्यांनी नमूद केले.



### 'चेहऱ्यावरून वय कळत नाही; हाडे दुखली की कळते'

अजय देवगण यांची ओळख ॲक्शन चित्रपटांतील दमदार भूमिकांसाठीही आहे. 'दृश्यम ३'मध्ये कदाचित फारसा ॲक्शन भाग नसला, तरी वय वाढल्याने व्यक्तिरेखा साकारण्याच्या पद्धतीत बदल झाल्याचे त्यांनी सांगितले. "मला ॲक्शन चित्रपटांसाठी ओळखले जाते. या चित्रपटात कदाचित मी फारसे ॲक्शन केलेले नाही. मात्र, वय वाढल्यामुळे एक प्रकारचा संयम आणि आत्मविश्वास आला आहे. त्यामुळे व्यक्तिरेखा तीच असली, तरी ती साकारण्याची पद्धत थोडी वेगळी जाणवू शकते," असे ते म्हणाले. यानंतर त्यांनी आपल्या स्टंट्सचा शरीरावर झालेला परिणाम विनोदी शैलीत सांगितला. ते म्हणाले, "चेहऱ्यावरून वय कळत नाही; पण सकाळी झोपेतून उठल्यानंतर हाडे दुखू लागली की वयाची जाणीव होते. पूर्वी मी जेवढे स्टंट केले आहेत, त्याचा परिणाम आता जाणवू लागला आहे."

## अभिनेत्री प्रतिभा रांटा हिची विशेष मुलाखत

# मुलींना हवे ते करण्याची संधी, मोकळीक मिळणे हेच मोठे सक्षमीकरण!



**'टीव्ही' आणि 'ओटीटी'नंतर 'लापता लेडीज' या चित्रपटामुळे देश-विदेशात लोकप्रिय झालेली अभिनेत्री प्रतिभा रांटा सध्या चर्चेत आहे. ऑस्करच्या शर्यतीत सहभागी झालेल्या 'लापता लेडीज'मधील तिच्या अभिनयाचे मोठे कौतुक झाले होते. त्यानंतर 'अक्यूज्ड' या ओटीटी चित्रपटातील दमदार अभिनयामुळेही तिने प्रेक्षकांची दाद मिळवली. आता निखिल अडवाणी दिग्दर्शित 'द रेव्होल्यूशनरीज' या वेबसीरिजमुळे प्रतिभा पुन्हा चर्चेत आली आहे.**

शिमल्यातून मुंबईत अभिनेत्री होण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या प्रतिभाला सुरुवातीला कुटुंबाचा विरोध सहन करावा लागला. मात्र, आपल्या स्वप्नासाठी तिने ठामपणे निर्णय घेतला आणि त्यानंतर कुटुंबीयांनीही तिच्या निर्णयाला पाठिंबा दिला. याच प्रवासाबाबत प्रतिभाने मनमोकळेपणाने संवाद साधला. आपल्या कारकिर्दीतील विविध टप्प्यांविषयी बोलताना प्रतिभा म्हणाली, की "मी मुंबईत आले, तो माझ्यासाठी आयुष्यातील सर्वांत मोठा स्वातंत्र्याचा क्षण होता. मुंबईत येण्यासाठी घरच्यांची समजूत काढणे हाच माझ्यासाठी सर्वांत मोठा टप्पा होता. आमच्या कुटुंबातील कोणीही दिल्लीपलीकडे गेलेले नव्हते. त्यानंतर मला ज्या ज्या संधी मिळाल्या, त्यात मी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच मी ऑडिशन देण्यास सुरुवात केली. त्यातूनच मला माझी पहिली मालिका 'कुर्बान' मिळाली. 'लापता लेडीज'मधील माझी भूमिकाही ऑडिशननंतरच मिळाली. या चित्रपटातील माझ्या कामाचे खूप कौतुक झाले. त्यानंतरच्या 'अक्यूज्ड' या चित्रपटातील माझ्या भूमिकेलाही प्रेक्षकांनी पसंती दिली," असे ती म्हणाली. "माझ्या कारकिर्दीत मी साकारलेल्या प्रत्येक व्यक्तिरेखा माझ्यापेक्षा पूर्णपणे वेगळ्या आहेत. त्या व्यक्तिरेखा साकारता आल्या, याचा मला अभिमान आहे," असे प्रतिभाने सांगितले.

### 'सर्वप्रथम क्रांती स्वत:मध्ये घडवावी लागते'

'द रेव्होल्यूशनरीज'मध्ये क्रांतिकारकाची भूमिका साकारणाऱ्या प्रतिभाने 'क्रांती' या संकल्पनेबाबतही आपले मत व्यक्त केले. ती म्हणाली, "मला वाटते की सर्वप्रथम आपल्याला स्वतःमध्ये क्रांती घडवावी लागते. आपल्या आयुष्यातील निर्णयांवर स्वतःचा अधिकार ठेवण्याचे धैर्य आपल्यात असायला हवे. मीही माझ्या आयुष्यातील प्राधान्यक्रम आणि निर्णयांसाठी एक प्रकारची क्रांती केली." "माझ्या कुटुंबातील कोणीही या क्षेत्रात नव्हते. त्यामुळे सुरुवातीला माझ्या निर्णयांना विरोध झाला. मात्र, नंतर माझ्या इच्छाशक्तीची जाणीव झाल्यावर कुटुंबीयांनीही मला पाठिंबा दिला. त्यांनी ज्या पद्धतीने मला साथ दिली, त्याचा मला आज अभिमान वाटतो," असे प्रतिभाने सांगितले. "माझे आजी-आजोबा आता ८५ वर्षांचे आहेत. काळानुसार माझ्या आजीने स्वतःमध्ये अतिशय सुंदर बदल घडवून आणला आहे. आज मी तिच्यासोबत माझ्या आयुष्यातील प्रत्येक गोष्ट शेअर करू शकते. आता माझी आजी माझी जिवलग मैत्रीण झाली आहे. ही माझ्यासाठी खूप सुंदर गोष्ट आहे," असेही ती म्हणाली.

### 'मुलींना जे करायचे आहे, ते करता आले पाहिजे...'

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना प्रतिभा म्हणाली, "मुलींना जे काही करायचे आहे, ते करण्याची संधी आणि मोकळीक मिळणे, हेच माझ्या मते सर्वांत मोठे सक्षमीकरण आहे. आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत, असे आपल्याला वाटते. मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती काहीशी वेगळी आहे. आजही असंख्य मुलींना पुढे जाण्यासाठी कुटुंबीयांच्या आणि समाजाच्या पाठिंब्याची गरज आहे." मुलगी असल्यामुळे कधी न्यूनगंड किंवा कमीपणाची भावना जाणवली का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ती म्हणाली, "न्यूनगंडाची भावना कधीही आणि कुठल्याही परिस्थितीत निर्माण होऊ शकते. एखादी मुलगी स्वतःचे मत मांडते किंवा आपले म्हणणे योग्य असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा तिला अनेकदा खूप विचारपूर्वक बोलावे लागते. कारण तिचे लगेच मूल्यमापन किंवा परीक्षण केले जाते. आपण अशा समाजात राहतो, जिथे मुलगी म्हणून प्रत्येक टप्प्यावर संघर्ष करावा लागतो. त्यामुळे मुलींना स्वतःचा आवाज ठामपणे मांडता येणे आणि आपल्या निर्णयांवर ठाम राहता येणे महत्त्वाचे आहे," असे प्रतिभाने स्पष्ट केले.

### 'रोहित सराफला भूमिकेसाठी कठोर मेहनत करताना पाहिले'

आपला सहकलाकार रोहित सराफ याच्याबद्दल बोलताना प्रतिभा म्हणाली, "रोहित सराफ खूप मेहनती आहेत. ते आहाराचे काटेकोरपणे पालन करत असताना आपल्या आहाराला बाधा येईल, असे काहीही खात नव्हते. आपल्या व्यक्तिरेखेसाठी शारीरिक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतल्याचे मी स्वतः पाहिले आहे", असे प्रतिभाने सांगितले.



### 'शिमल्यात फिरताना इतिहासाच्या खुणा शोधते'

प्रतिभाची आगामी वेबसीरिज १८५७च्या स्वातंत्र्यलढ्यावर आधारित आहे. या मालिकेत ती युवा क्रांतिकारक प्रतिभा लाहिरीची भूमिका साकारत आहे. ऐतिहासिक व्यक्तिरेखा साकारण्याच्या अनुभवाबद्दल ती म्हणाली, "जेव्हा आपण इतिहासाशी संबंधित व्यक्तिरेखा साकारतो, तेव्हा त्या व्यक्तीचा संघर्ष समजून घेणे आणि त्या व्यक्तिरेखेशी प्रामाणिक राहणे अत्यंत आवश्यक असते. निखिल अडवाणी आणि संपूर्ण टीमने या मालिकेसाठी सखोल संशोधन केले आहे. त्याचबरोबर कथेत नाट्यमयता आणण्यात आली आहे, कारण प्रेक्षकांचे मनोरंजन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे." "मी स्वतः शिमल्यासारख्या शहरातून आले आहे, हीदेखील एक विशेष आणि योगायोगाची गोष्ट आहे. शिमल्यातील वास्तुकला आणि शहराची रचना आजही ब्रिटिश आणि स्कॉटिश प्रभावाची जाणीव करून देते. माझ्या शहराचा देशाच्या स्वातंत्र्यलढ्याशीही जवळचा संबंध आहे," असे प्रतिभाने सांगितले. "ब्रिटिश काळात १८६४ ते १९४७ या काळात शिमला भारताची उन्हाळी राजधानी होती. त्यामुळे मी शहरात फिरताना अनेकदा विचार करायचे की, ब्रिटिश राजवटीच्या काळात येथे नेमके काय घडले असेल. माझ्या शहरातील अनेक ठिकाणांची नावे आजही ब्रिटिशकालीन आहेत," असे तिने सांगितले. "या मालिकेतील चार महत्त्वाच्या क्रांतिकारकांबद्दल रासबिहारी बोस, सचिंद्रनाथ सान्याल, बाघा जतिन आणि मी साकारत असलेल्या व्यक्तिरेखेबद्दल वाचताना त्यांच्या धैर्याने मीही खूप प्रभावित झाले," असे प्रतिभाने नमूद केले.

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



### छऱ्याच्या बंदुकीच्या वादातून दगडाने ठेचून खून

## विष्णुपुरी खून प्रकरणाचा अवघ्या काही तासांत छडा; बंद खोलीत लपवलेला मृतदेह आढळला, आरोपीला अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** विष्णुपुरी शिवारात एका तरुणाचा खून करून मृतदेह बंद खोलीत लपवून ठेवल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणातील आरोपीला नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद केले आहे.

मयताचे नाव सनी अजेबसिंग मसीह (वय ३६, रा. इसानगर, बटाला, जि. गुरदासपूर, पंजाब) असे आहे. मयत आणि आरोपी दारासिंग गुरुनामसिंग हे दोघे विष्णुपुरी शिवारातील एका खोलीत भाड्याने राहत होते. छऱ्याची बंदूक हिसकावून परत न दिल्याच्या वादातून दि. २९ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता आरोपी दारासिंग याने दगडाने डोक्यावर व तोंडावर वार करून सनीचा जागीच खून केला आणि मृतदेह खोलीतच ठेवून बाहेरून कुलूप लावून पळून गेला.



खोलीतून दुर्गंधी येऊ लागल्याने दि. २ ऑक्टोबर रोजी पोलिसांना माहिती मिळाली. पोलिसांनी पंचांसमक्ष कुलूप तोडून सडलेल्या अवस्थेतील मृतदेह ताब्यात घेतला. फिर्यादी सुरज शास्त्री यांच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १२८३/२०२६, कलम १०३(१), ३५१(२), ३५१(३) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपी पंजाबचा असल्याने पसार होण्याच्या तयारीत होता. मात्र पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या आदेशाने तयार करण्यात आलेल्या पथकाने गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी दारासिंग गुरुनामसिंग (वय ५१, रा. धुण घेवाला, ता. तरन, जि. तरनतारन, पंजाब; सध्या रा. विष्णुपुरी, नांदेड) याला ताब्यात घेतले. पुढील तपास सपोनि कपील पाटील करीत आहेत.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील व सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. ओमकांत चिंचोलकर, पोउपनि व्यंकट कुसमे, सुनील भिसे, बाबुराव चव्हाण व अंमलदार माधव मारवाडे, लक्ष्मण जाधव, माळगे, शेख, कांबळे, विठ्ठल भिसे, कल्याणकर, पवार, शेख गफार, जीवन तेलंग, भगवान टिपरसे, संतोष जाधव, बुंगई, कवडे व सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर यांनी पार पाडली.

## कोरडा दुष्काळ व नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील धनज (बुद्रुक) येथे कोरड्या दुष्काळामुळे झालेल्या नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून एका वयोवृद्ध शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.

मयताचे नाव किशन गंगाराम गवाले (वय ७२ वर्षे, रा. धनज बुद्रुक, ता. लोहा, जि. नांदेड) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार यंदा अत्यंत कमी पाऊस झाल्याने त्यांच्या शेतातील पिके वाया गेली होती. त्यातच बँकेचे कर्ज कसे फेडावे या चिंतेने ते गेल्या काही दिवसांपासून तणावात होते. दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६.४५ वाजेच्या सुमारास धनज बुद्रुक शेतशिवारात त्यांनी टोकाचे पाऊल उचलले.

या प्रकरणी मयताचा मुलगा गंगाधर किशन गवाले (वय ३५) यांनी दिलेल्या खबरीवरून उस्माननगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू क्र. ४३/२०२६, कलम १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अन्वये नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हवालदार तिडके करत आहेत.

तालुक्यात सलग दुसऱ्या वर्षी पावसाने दगा दिल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. प्रशासनाने तातडीने दुष्काळी उपाययोजना जाहीर कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

## 'केवायसी' अपडेटच्या नावाखाली फसवणूक; नागरिकांना सावध राहण्याचे पोलिसांचे आवाहन

### फसवणूक झाल्यास तत्काळ १९३० वर संपर्क साधा -डॉ. नीलभ रोहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सध्या सायबर भामट्यांकडून बँक केवायसी अपडेटच्या नावाखाली नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात आहे. तुमचे केवायसी संपले आहे. त्वरित अपडेट करा अन्यथा खाते बंद होईल असा मेसेज पाठवून बनावट लिंकवर क्लिक करायला लावून बँक खाते रिकामे करण्याचे प्रकार वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.



नांदेड सायबर पोलिसांनी प्रसिद्ध केलेल्या जनजागृती पोस्टरमध्ये नागरिकांनी घ्यावयाची काळजी स्पष्ट करण्यात आली आहे.

केवायसी अपडेटच्या नावाने आलेल्या कोणत्याही संशयास्पद Link वर घाईत Click करू नका. KYC अपडेट फक्त संबंधित बँक किंवा Service Provider च्या अधिकृत app/Website वरूनच करा. KYC च्या नावाखाली कोणीही OTP, PIN, CVV,Password किंवा बँक खात्याची माहिती मागत असेल तर कोणालाही देऊ नका.

अनोळखी व्यक्तीने सांगितलेले कोणतेही PK App डाऊनलोड करू नका आणि Screen Sharing/Remote ccess देऊ नका. नागरिकांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. जर सायबर फसवणूक झालीच तर त्वरित १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, आपत्कालीन मदतीसाठी ११२ वर कॉल करावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन व नांदेड पोलिसांच्यावतीने करण्यात आले आहे.




**नांदेड** –इंडिया आघाडीच्यावतीने ७ ऑक्टोबर रोजी भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात महामोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या पूर्वतयारीच्या नियोजनासाठी नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नवा मोंढा येथील कार्यालयात खासदार रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी माजी आमदार हणमंत पाटील बेटमोगरेकर, भगवानराव पाटील आलेगावकर, बबन बारसे, भुजंग पाटील, सुरेश गायकवाड, विठ्ठल पावडे, आनंद चव्हाण, अब्दुल गफार, मुन्ना अब्बास, सुनील पाटील कदम, प्रदीप नागापूरकर, विनोद गोविंदवार, तातेराव पाटील, मनोज यादव, गंगाधर गायकवाड, राजू पाटील, सूरज शिंदे, गणेश पाटील कोकाटे आदी उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस)**

## येरगी ग्रामसभेत केंद्रीय सहसचिव पी. नरहरी यांचा सहभाग; बालिका पंचायत उपक्रमाचे केले कौतुक

### महिला ग्रामस्थांचा उत्स्फुर्त सहभाग, जलतारा कामांचे भूमिपूजन व वृक्षारोपण

**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्र सरकारचे सहसचिव पी. नरहरी यांनी देगलूर तालुक्यातील येरगी येथे दि. २ ऑक्टोबर रोजी आयोजित ग्रामसभा व रिफॉर्म उत्सवात सहभाग घेऊन ग्रामस्थांशी थेट संवाद साधला.

यावेळी त्यांनी ग्रामविकासाच्या विविध विषयांवर ग्रामस्थांची मते व सूचना जाणून घेतल्या आणि शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले. रिफॉर्म उत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, लोककल्याणकारी उपक्रम आणि प्रशासकीय सुधारणांची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचवण्यात आली. त्यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधून योजनांमुळे त्यांच्या जीवनात झालेल्या बदलांची माहिती घेतली.

येरगी येथील बालिका पंचायत या उपक्रमाची नरहरी यांनी विशेष दखल घेत कौतुक केले. ग्रामीण भागातील बालिकांना ग्रामविकासात सहभागी करून नेतृत्वगुण विकसित करणे हा उपक्रम अनुकरणीय असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नरहरी यांच्या हस्ते वृक्षारोपण आणि जलतारा कामांचे भूमिपूजन करण्यात आले. जलसंधारण, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत ग्रामविकासाला गती देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने तयार केलेले पोस्टर्स, बॅनर्स व शासन आदेशांची मांडणी पाहून त्यांनी योजनांच्या प्रसारासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. या ग्रामसभेत महिलांचा सहभाग लक्षणीय होता. महिलांनी उत्स्फूर्तपणे आपली मते व अनुभव मांडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष पाटील यांनी केले, तर आभार ग्रामविकास अधिकारी माधव शिंदे यांनी मानले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, मयूरकुमार आंदेलवाल, अमित राठोड, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भरत सूर्यवंशी, गटविकास अधिकारी एच. एस. बळदे, पोलीस निरीक्षक आर. एम. हुंडेकर, सहाय्यक गटविकास अधिकारी ए. एल. पासले यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वारातीम विद्यापीठाच्या भाषा संकुलात अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –अभिजात मराठी भाषा सन्मान दिवसाच्या निमित्ताने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा संकुलात अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस उत्साजात साजरा करण्यात आला. यावेळी अभिजात मराठी साहित्याचे प्रकट वाचन करण्यात आले.

मराठी भाषेसंदर्भात भाषा संकुलात वर्षभर प्रयोगशील उपक्रम आयोजित केले जातात. संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर आणि डॉ. पी. विठ्ठल हे महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे सदस्य असून, मराठी भाषेचे धोरण ठरवणाऱ्या समितीमध्ये त्यांचा सहभाग होता. याशिवाय डॉ. वैजनाथ अनमुलवाड आदिवासी संस्कृती व बोलींचे अभ्यासक म्हणून परिचित आहेत.

केंद्र सरकारने दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. त्या अनुषंगाने ३ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र शासनाने हा दिवस 'अभिजात मराठी भाषा दिन' म्हणून जाहीर केला आहे.

या दिवसाचे औचित्य साधून भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी मराठीतील अभिजात साहित्याचे प्रकट वाचन केले आणि मराठी भाषेच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासाला उजाळा दिला. भाषा संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर, मराठी भाषा अधिकारी डॉ. पी. विठ्ठल आणि आदिवासी साहित्याचे अभ्यासक डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी विविध कलाकृतींचे प्रकट वाचन करून विद्यार्थ्यांना अभिजात मराठी भाषेच्या वाटचालीचा प्रत्यय दिला.

यावेळी गाथा सप्तशती, लीळाचरित्र, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी, संत नामदेव गाथा, सकल संतगाथा, संत तुकाराम गाथा, मराठीतील निवडक पोवाडे व लावण्या आणि ब्रिटिश आमदानीतील नाट्यपदांचे अभिवाचन करण्यात आले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली भाषा संकुलाच्या वतीने अभिजात मराठी भाषा सन्मान सप्ताहात 'शब्दांची जुगलबंदी' या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, दिनांक ७ ऑक्टोबर रोजी कविसंमेलन, कथाकथन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आजच्या प्रकट अभिवाचनाच्या कार्यक्रमास भाषा संकुलातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## संतोषी पटणे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील प्रसिद्ध शासकीय कंत्राटदार व चैतन्यनगर शिवमंदिर व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माधवराव पटणे यांच्या सूनबाई सौ. संतोषी संतोष पटणे यांचे काल रात्री अल्प आजाराने निधन झाले. त्या ४२ वर्षांच्या होत्या.



त्यांच्या पार्थिव देहावर कारेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी साश्रूनयनाने संतोषी पटणे यांना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात पती, २ मुली असा परिवार आहे.

## कै. माधवराव पाटील शेळगावकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आज शोकसभा

**नायगाव (प्रतिनिधी)–** कै. माधवराव पाटील शेळगावकर यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी शेळगाव (गौरी) ग्रामपंचायत व समस्त गावकरी मंडळींच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही शोकसभा सोमवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता राजर्षी शाहू महाराज मंगल कार्यालय येथे होणार आहे.



या वेळी ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार व हितचिंतक एकत्र येऊन कै. माधवराव पाटील शेळगावकर यांच्या स्मृतींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणार आहेत.

या शोकसभेस शेळगाव (गौरी) तसेच परिसरातील सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेळगावकर कुटुंबियांच्या दुःखात सहभागी व्हावे व दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन ग्रामपंचायत तथा समस्त गावकरी मंडळी, शेळगाव (गौरी) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शालिनी पांडुर्णीकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील पिवळी गिरणी येथील रहिवासी व सध्या शासकीय आदिवासी मुलींचे वसतिगृह नंदुरबार येथील अधिक्षिका शालिनी दीपक पांडुर्णीकर (वय ५० वर्षे) यांचे शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी साडेसात वाजता शांतीधाम गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, सासू असा परिवार आहे. शासकीय आय.टी.आय. अर्धापूर येथील प्रा. दीपक पांडुर्णीकर यांच्या त्या पत्नी होत.



## स्वच्छता मोहीम, महाश्रमदान, कचरा वर्गीकरण, प्लास्टिक निर्मूलनासह विविध उपक्रमांनी अभियानाचा समारोप

**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता ही सेवा पंधरवड्याचा नांदेड जिल्ह्यात उत्स्फूर्त सहभाग आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छ भारत दिवस साजरा करून समारोप करण्यात आला. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यातील ग्रामीण भागात स्वच्छता, जनजागृती आणि लोकसहभागावर भर देत विविध उपक्रम राबविण्यात आले.



पंधरवड्याच्या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर महाश्रमदान, अस्वच्छ ठिकाणांची स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, शाळा व अंगणवाडी परिसर स्वच्छता तसेच युवकांचा सक्रिय सहभाग घेण्यात आला. बाजारपेठा, बसस्थानके आणि इतर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली.

कचरा व्यवस्थापन आणि कचरा वर्गीकरणाला विशेष महत्त्व देण्यात आले. ओला, सुका आणि घातक कचरा यांचे स्वतंत्र संकलन, वर्गीकरण व योग्य व्यवस्थापन याबाबत नागरिक, विद्यार्थी आणि ग्रामपंचायत स्तरावर मार्गदर्शन करण्यात आले. घनकचरा व्यवस्थापनासंदर्भातील नियम, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका व जबाबदारी याबाबतही जनजागृती करण्यात आली.

## बालाजी येरावार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील व्यापारी बालाजी सखाहारी येरावार यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार दि. ३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२:३० वाजता गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात राहुल व रितेश (दोन मुले) व एक मुलगी असून ते प्रशांत चालिकवार यांचे सासरे होत. त्यांच्या अंत्यविधीस सर्व समाज बांधव, व्यापारी, मित्र उपस्थित होते. तसेच फर्टीलायझर असोसिएशन व आर्य वैश्य महासभेतर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली.

## स्वारातीम विद्यापीठात स्वामी रामानंद तीर्थ यांची जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात स्वामी रामानंद तीर्थ यांची जयंती शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.

या निमित्ताने विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीसमोरील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते चंदनहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित जयंती कार्यक्रमात पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी डॉ. गोविंद कटलाकुटे, विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवोपक्रम, संशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, आयक्यूएसीचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सिस्टिम एक्सपर्ट सुनील जाधव यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com